- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

# दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

▸ संपादक (विकास) : श्याम पेठकर ▸ संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

**सोने-चांदी**
- २४ कॅरेट : १,४८,७०० /-
- २३ कॅरेट : १,४६,३५० /-
- चांदी : २,३८,३००/-

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २९५ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# राहुल गांधींनी लॉंच केला 'सत्याग्रह' मंच

## देशभरातील सर्व आंदोलने एकाच नकाशावर!

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

राहुल गांधींनी सत्याग्रह वेबसाईट लॉन्च केली आहे. त्यांनी सांगितले की, याचा उद्देश संघर्ष करणाऱ्या आणि विरोध करणाऱ्या लोकांना आवाज देणे हा आहे. त्यांनी लोकांना आपली गोष्ट शेअर करण्याचे आवाहन केले आहे.
काँग्रेसचे माजी अध्यक्ष आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शनिवारी सत्याग्रह नावाच्या एका नव्या मंचची सुरुवात केली. या मंचचा उद्देश देशभरात आपल्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या लोकांचा आवाज एका सामायिक मंचावर आणणे हा आहे. राहुल गांधींनी महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त याची सुरुवात केली आणि यासंदर्भातील वेबसाईटची लिंकही शेअर केली.
त्यांनी एक व्हीडीओ जारी करून म्हटले, जेन झी, विद्यार्थी, शेतकरी, आदिवासी, दलित, महिला, प्रत्येक संघर्षाची स्वतःची एक गोष्ट आहे. मात्र जो आवाज एकटा उठतो, तो अनेकदा दाबला जातो. त्यांनी म्हटले, देशभरात लोक अन्यायाविरोधात आवाज उठवत आहेत. विरोधी पक्षनेता म्हणून तुमची लढाई ही माझी लढाई आहे. आता नव्या सत्याग्रहाची वेळ आहे. तुम्ही कोणत्या मुद्यांसाठी संघर्ष करत आहात, ते मला सांगा. मी तुमचे म्हणणे ऐकत आहे.
काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे की, सत्याग्रह हा या सर्व आवाजांना एका मंचावर एकत्र आणण्याचा उपक्रम आहे. राहुल गांधींनी लोकांना आवाहन केले की, जर ते कोणत्याही अन्यायाविरोधात लढत असतील, तर त्यांनी आपली गोष्ट या मंचावर शेअर करावी. त्यांनी म्हटले, तुमच्यासारखे आणखी कोण-कोण लढत आहेत, हे तुम्ही पाहाल. आणि मी जे काही करू शकतो, ते करेन - संसदेत, रस्त्यावर, पत्र लिहून, जिथे जिथे माझी गरज असेल तिथे तुमच्यासोबत उभे राहून - विरोधी पक्षनेता म्हणून ही माझी जबाबदारी आहे. त्यांचे म्हणणे आहे की, या मंचाच्या माध्यमातून लोक आपली ओळख, आपले मुद्दे आणि त्यांच्या हक्कांच्या मार्गात उभ्या असलेल्या आव्हानांची माहिती शेअर करू शकतात.



### प्रत्येक संघर्षाची स्वतःची एक कहाणी

एकट्याने उठणारा आवाज अनेकदा दाबला जातो. सत्याग्रह हा या सर्व आवाजांना एका नकाशावर एकत्र आणण्याचा एक उपक्रम आहे. महात्मा गांधींच्या विचारांचा संदर्भ देत राहुल गांधी म्हणाले की, बापूंनी सत्याग्रहाचा मार्ग दाखवला. ते म्हणाले की सत्य हे सर्वांत मोठे शस्त्र आहे, परंतु सत्यासोबत एकजूट होऊन उभे राहणे ही त्याहूनही मोठी शक्ती आहे. त्यांनी अन्यायाविरुद्ध संघर्ष करणाऱ्या लोकांना आपल्या कथा सांगण्याचे आवाहन केले.

### विरोधाला आवाज देणे हा उद्देश

राहुल गांधींनी म्हटले, संपूर्ण देशात सत्य दाबले जात आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये अनेक विरोध प्रदर्शने होत आहेत. कुठे जमिनीसाठी, कुठे महिलांच्या हक्कांसाठी, कुठे दलित आणि ओबीसींच्या हक्कांसाठी, तर कुठे शिक्षण आणि परीक्षांबाबत. आम्हाला या सर्व आंदोलनांना संघटित करायचे आहे, त्यांना एका मंचावर एकत्र आणायचे आहे आणि तुमच्यासोबत मिळून तुम्ही ज्या लढ्यासाठी उभे आहात, तो सोडवण्यासाठी आम्ही तुमची कशी मदत करू शकतो, हे पाहण्यात मदत करायची आहे.

# तिसऱ्या वनडेत वेस्ट इंडिजचा भारतावर दणदणीत विजय

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

न्यू चंदीगडच्या मुल्लानपूर येथे भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तिसरा एकदिवसीय सामना पार पडला. वेस्ट इंडिजनं भारताला ५ विकेटनं पराभूत करत शेवट गोड केला. भारतानं प्रथम फलंदाजी करताना ७ बाद ३५१ धावा केल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाग वेस्ट इंडिजनं १० बॉल शिल्लक ठेवत केला. वेस्ट इंडिजनं ४८.२ षटकांत सामन्यात विजय मिळवला. वेस्ट इंडिजचा कर्णधार शाई होप याने नाबाद १६२ धावा करुन संघाला विजय मिळवून दिला. भारतानं ही मालिका २-१ नं जिंकली.




शाई होप यानं वेस्ट इंडिजच्या डावाची सुरुवात केली आणि सामना जिंकवून तो मैदानाबाहेर गेला. होपनं १४३ बॉलमध्ये १६२ धावा केल्या. या दरम्यान त्यानं १७ चौकार आणि ३ षटकार मारले. वेस्ट इंडिजचा मुख्य सलामीवीर दुखापतग्रस्त झाल्यानं शाई होपनं डावाची सुरुवात केली. ज्वेल एंड्रयू हा क्षेत्ररक्षण करताना दुखापतग्रस्त झाला होता. जॉन कॅम्पबेल १० धावा करुन बाद झाला. शाई होप आणि आमिर जंगू यानं दमदार फलंदाजी केली.
दोघांनी १०९ धावांची भागीदारी केली. जंगूनं ५६ बॉलमध्ये ६७ धावा केल्या.त्यानं पाच षटकार आणि एख षटकार मारला. शरफेन रदरफोर्ड यानं २४ धावा केल्या. वेस्ट इंडिजनं ३० ओव्हरमध्ये ३ विकेटवर २०६ धावा केल्या होत्या. तेव्हा भारत सामना जिंकेल असं वाटलं होतं.शाई होपशिवाय इतर कोणताही फलंदाज बाकी नव्हता. मात्र कीमो पॉल यानं कर्णधाराची साथ दिली. पॉलनं ३५ बॉलमध्ये ४४ धावा केल्या. ४४ व्या ओव्हरमध्ये पाच विकेटवर २९० धावांपर्यंत वेस्ट इंडिजनं मजल मारली होती. भारताचा विजय पक्का असं वाटत होतं मात्र शाई होपनं संघाला विजय मिळवून दिला. गुडाकेश मोतीनं देखील शाई होपला चांगली साथ दिली. त्यानं १९ धावा केल्या.
विशेष म्हणजे, भारताकडून केएल राहुल यानं नाबाद १२९ धावा केल्या होत्या. रोहित शर्मा ९२ धावा, ऋतुराज गायकवाड यानं ५७ धावांची खेळी केली. दरम्यान शुभमन गिल यानं १ रन केली तर विराट कोहली उघडू शकला नाही. भारतानं ही मालिका २-१ नं जिंकली आहे.

## प्रेमानंद महाराजांचा आश्रम पुन्हा वादात

**वृंदावन :** वृंदावन येथील प्रेमानंद महाराजांचा राधा केलि कुंज आश्रम पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. एका शिष्याचा संशयास्पद मृत्यू झाल्यानंतर आता आश्रमाशी संबंधित आणखी काही घटना घडल्या आहेत. आश्रमात आलेला १७ वर्षीय अनुज चौधरी हा मुलगा बेपत्ता झाल्याचा दावा त्याच्या कुटुंबीयांनी केला आहे. मुलाचा शोध घेण्यासाठी त्याचे कुटुंबीय प्रेमानंद महाराजांच्या आश्रमासमोर आंदोलनाला बसले आहेत. अनुजला सुखरूप परत आणावे, अशी त्यांची मागणी आहे. तसेच आश्रमातील काही शिष्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याचा आरोपही कुटुंबीयांनी केला आहे.
याचदरम्यान नोएडाहून प्रेमानंद महाराजांच्या आश्रमात आलेली एक महिलाही बेपत्ता असल्याची माहिती समोर आली आहे. तिचे वडील मुलीचा शोध घेत वृंदावनमध्ये दाखल झाले आहेत. याशिवाय आश्रमाबाहेरील एका ढाब्यावर काम करणा-या महिलेचे १० वर्षांचे मूलही बेपत्ता असल्याचे सांगितले जात आहे. या घटनांमुळे आश्रमातील व्यवस्थेबाबत विविध चर्चा सुरू झाल्या आहेत. प्रेमानंद महाराज गेल्या काही वर्षांत सोशल मीडियामुळे मोठ्या प्रमाणात चर्चेत आले. २०२३ मध्ये विराट कोहली आणि अनुष्का शर्मा आपल्या मुलीसह त्यांच्या आश्रमात पोहोचले होते. त्यानंतर प्रेमानंद महाराजांची देशभरात मोठी चर्चा झाली.

### थोडक्यात

## हिंगोली जिल्ह्यात भूकंपाची नोंद

**लातूर :** दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ७.४६ व ९.४३ वाजता हिंगोली जिल्ह्यातील पांगरा शिंदे तालुका वसमत येथे भूकंपाची अनुक्रमे ३.३ आणि ४.५ रिस्टर स्केल इतक्या तीव्रतेच्या भूकंपाची नोंद झाली. या भूकंपामुळे नांदेड जिल्ह्यात आणि लातूर जिल्ह्यातील अहमदपूर येथील काही भागात सौम्य धक्के जाणवले. या भूकंपाचा केंद्रबिंदू मौजे पांगरा शिंदे तालुका वसमत जिल्हा हिंगोली येथे होता. प्राथमिक माहितीनुसार कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झालेली नाही, अशी माहिती लातूर जिल्हा प्रशासनाने दिली आहे. नागरिकांनी भूकंपाचे धक्के बसत असताना पटकन मोकळ्या जागेत जावे, विशेषत कच्चे बांधकाम, (दगड मातीचे बांधकाम) असलेल्या घरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाने दिलेल्या अधिकृत माहितीची व सूचनांची नोंद घ्यावी, असे आवाहन लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले आणि जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

## पेट्रोलच्या दरात ५ तर डिझेलच्या ३ रुपयांची वाढ

**नवी दिल्ली :** भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठी पेट्रोलियम रिटेलर कंपनी नायरा एनर्जीनं पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढीचा निर्णय घेतला आहे. ही दरवाढ तात्काळ लागू होणार आहे.आंतरराष्ट्रीय तेल बाजारात क्रूड ऑईलचे दर वाढल्यानं निर्माण झालेल्या दबावामुळं नायरा एनर्जीनं पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ केली आहे.

# चिनी ध्वजाच्या रंगांनी उजळला बुर्ज खलिफा

**दुबई :** संयुक्त अरब अमिरातीमधील दुबई शहरात स्थित जगातील सर्वांत उंच इमारत असलेल्या बुर्ज खलिफावर चीनच्या राष्ट्रीय दिनानिमित्त एक अत्यंत प्रेक्षणीय आणि ऐतिहासिक लाईट शो आयोजित करण्यात आला.



चीनच्या पीपल्स रिपब्लिकच्या स्थापनेचा ७७ वा वर्धापनदिन साजरा करण्यासाठी ८२८ मीटर उंच असलेल्या या अथांग गगनचुंबी इमारतीला लाल दिव्यांच्या भव्य रोषणाईने सजवण्यात आले होते. या विशेष प्रसंगी बुर्ज खलिफाचे सौंदर्य पाहण्यासाठी हजारो स्थानिक रहिवासी आणि आंतरराष्ट्रीय पर्यटक एकत्र आले होते.
चीनच्या राष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून चायना मीडिया ग्रुपने या विशेष व्हीडीओ लाईट शोचे आयोजन केले होते. जागतिक माध्यमांच्या इतिहासात ही पहिलीच वेळ आहे, जेव्हा जगातील सर्वांत प्रतिष्ठित आणि उंच इमारतीवर चायना मीडिया ग्रुपचा अधिकृत व्हिज्युअल लाईट शो प्रदर्शित करण्यात आला. या प्रदर्शनाने दुबईच्या रात्रीच्या क्षितिजाला एका वेगळ्याच लाल तेजाने उजळवून टाकले. या तांत्रिक आणि सांस्कृतिक प्रयोगाने जगभरातील प्रसारमाध्यमांचे आणि पर्यटकांचे लक्ष वेधून घेतले.

# समृद्धी महामार्गावर पुन्हा एक अपघात; ट्रकचा टायर निघाल्याने वाहन उलटले, ९ जण गंभीर

**दै. सिंहवाणी वृत्त, अमरावती**

नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून आज तळेगाव दशासर पोलीस ठाण्याच्या हद्दीत धावत्या पिकअप वाहनाचे पुढील एक चाक अचानक निघाल्याने वाहन अनियंत्रित होऊन महामार्गावर उलटले. या अपघातात ९ मजूर गंभीररीत्या जखमी झाले, तर ८ जण किरकोळ जखमी झाले. सर्व १७ जखमींना उपचारासाठी धामणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार भंडारा जिल्ह्यातील लाखांदूर तालुक्यातील २३ मजूर कामाच्या शोधासाठी बुलढाण्याकडे एमएच ३७/ टी ४१८३ क्रमांकाच्या महिंद्रा पिकअप वाहनातून जात होते. आज सकाळी मुंबईच्या दिशेने चॅनेल क्रमांक १२७ जवळ अचानक पिकअप वाहनाचा पुढील डाव्या बाजूचा टायर निघाला. त्यामुळे चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि भरधाव वेगातील पिकअप वाहन महामार्गावर उलटले. या पिकअपमधून एकूण २० जण प्रवास करीत होते.
अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलिसांनी अपघातस्थळी धाव घेतली. त्यांनी तत्काळ बचावकार्य सुरू केले आणि जखमींना बाहेर काढण्यास मदत केली. या अपघातात ९ मजूर गंभीररीत्या जखमी झाले आहेत. उषा शिवरकर, रीना रामटेके, बंडू उरकुडे, संजय सौंदरकर, शांता सोनवणे, वंदना बुराडे यांचा गंभीर जखमींमध्ये समावेश आहे. या अपघातात ८ जण किरकोळ जखमी झाले आहेत. सर्व जखमींना तातडीने धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वाहनचालक ओम पंढरी तनपुरे (वय २६, रा. वाकद, ता. रिसोड) यांच्यासह काही प्रवाशांना सुदैवाने दुखापत झाली नाही.
अपघातानंतर पोलिसांनी क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त पिकअप वाहन महामार्गाच्या शोल्डर लेनवर हलविले. घटनास्थळी कठडे व कोन्स लावून वाहतूक सुरक्षित करण्यात आली. तळेगाव दशासर पोलिसांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी पोहोचून महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली. या अपघाताचा पुढील तपास तळेगाव दशासर पोलीस करीत आहेत.
समृद्धी महामार्गावर गुरुवारी (२ ऑक्टोबर) झालेल्या भीषण अपघातात दुर्गादेवीची मूर्ती घेऊन जाणाऱ्या बोलेरो पिकअपला ट्रकने धडक दिल्याने वर्धा येथील ७ भाविकांचा मृत्यू झाला होता, तर अनेक जण जखमी झाले होते. या घटनेच्या धक्क्यातून लोक सावरत असतानाच दुसऱ्याच दिवशी पुन्हा पिकअप वाहनाला झालेल्या अपघातामुळे समृद्धी महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# विमान दुरुस्ती करणाऱ्या इंडेमारमध्ये अपघात; रक्षकाचा मृत्यू, दुसरा गंभीर

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

विमानाची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी मिहान प्रकल्पाला लागून सुरू करण्यात आलेल्या इंडेमार प्रकल्पात शनिवारी सकाळी भीषण घटना घडली. दुरुस्तीसाठी आलेल्या विमानाला आत प्रवेश करण्यासाठी जागा उपलब्ध करून देत असताना लोखंडी दरवाजा उघडताना त्याचा तोल गेला. वजनी गेट अंगावर येऊन कोसळल्याने त्या खाली दबल्या गेलेल्या दोन पैकी एका सुरक्षा रक्षकाचा उपचारासाठी नेत असताना मृत्यू झाला.
सोनेगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार डॉ. बाबासाहेब



आंबेडकर आंतरराष्ट्रिय विमानतळाच्या धावपट्टीला लागून असलेल्या मिहान सेझ प्रकल्पातील इंडेमार प्रकल्पात शनिवारी सकाळी सव्वा दहा ते साडेदहाच्या सुमारास हा अपघात झाला. कैलास चाफेकर असे लोखंडी गेट अंगावर कोसळून त्या खाली दाबल्या गेलेल्या सुरक्षा रक्षकाचे नाव आहे. प्राथमिक माहितीनुसार या अपघातात आणखी एक सुरक्षा रक्षक अरमान प्रधान हे जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या एम्समध्ये उपचार सुरू आहेत.
डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूर आंतरराष्ट्रिय विमानतळावर येणाऱ्या विमानांची देखभाल आणि किरकोळ दुरुस्तीचे काम या समुलाला मिळाले आहे.
शिवणगाव परिसरातील विमानतळाला लागून असलेल्या धावपट्टीला लागून या समुहाचा प्रकल्प आहे. येथे आलेल्या विमानात काही तांत्रिक बिघाड असल्याने शनिवारी त्याची इंडेमारमध्ये देखभाल दुरुस्ती केली जाणार होती. त्यासाठी सकाळी समुहातील ३ एच. १ येथील लोखंडी गेट उघडले जाणार होते. सकाळी गेट उघडत असताना परिसरात ६ सुरक्षा रक्षक तैनात होते. गेटचा एक भाग उघडत असताना अचानक वजनामुळे या वजनी लोखंडी गेटचा तोल गेला. त्याच वेळी एका दिशेने उभे असलेले दोन सुरक्षा रक्षक कैलास चाफेकर आणि अरमान प्रधान त्याच्याखाली दाबले गेले. वजनी गेट अचानक अंगावर पडल्याने दोघेही खाली चेपले गेले.
दरम्यान सोनेगाव पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनास्थळी पोचलेल्या पोलिसांच्या मदतीने अन्य कामगारांनी धावपळ करत गेट बाजूला केले आणि जखमी कैलास चाफेकर, अरमान प्रधान यांचा तातडीने एम्समध्ये दाखल केले. डॉक्टरांनी कैलास यांना तपासत मृत घोषित केले. दरम्यान प्रधान यांच्यावर उपचार सुरू आहेत.

# पंजाबच्या अमृतसरमध्ये सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर मॅडी संधूला संपवलं

**वृत्तसंस्था, अमृतसर**

पंजाबच्या अमृतसरमध्ये सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर मॅडी संधू याच्यावर भरदिवसा गोळीबार करण्यात आला. गोळ्या लागल्यानं मॅडी संधू रस्त्यावर कोसळल्याचं पाहायला मिळतं. हल्लेखोरांनी गोळी मारल्यानंतर मॅडी संधूचा रस्त्यावर पडतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होतं आहे. मॅडी संधू रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. व्हिडिओ व्हायरल होताच खळबळ उडाली होती. मॅडी संधू याला रुग्णालयात नेताना त्याचा मृत्यू झाला.



अमृतसरमध्ये गोळीबाराची घटना घडल्यानं खळबळ उडाली आहे. मॅडी संधूच्या हत्येनंतर पोलिस घटनास्थळी पोहोचले असून त्यांच्याकडून चौकशी सुरु करण्यात आली आहे.
मॅडी संधू मधुसूधन नावानं प्रसिद्ध होता. पॉडकास्टमध्ये तो गेस्ट मेकअप, चित्रपट सृष्टीतील जेंडर इश्यूज संदर्भात चर्चा करायचा. या दरम्यान सोशल मीडिवर त्याचं अनेकदा ट्रोल झाला होता. त्यानं अनेकदा देवानं जसं बनवलंय तसा असल्याचं म्हटलं होतं.मॅडी संधूच्या हत्येच्या एक वर्ष अगोदर देखील अशीच एक घटना बठिंडामध्ये झाली होती. त्यावेळी त्या घटनेची जबाबदारी कट्टरतावादी शिख संघटनांनी घेतली होती.
अतिरिक्त पोलीस उपायुक्तांनी दोन अज्ञात लोकांनी सायंकाळी ६ वाजता मैड संधूवर गोळीबार झाल्याची माहिती दिली. पोलिसांकडून या घटनेची चौकशी केली जात आहे. या घटनेतील आरोपींबाबत देखील चौकशी सुरु केली आहे. पोलिसांकडून प्रत्येक पैलूची सखोल चौकशी केली जात आहे. पोलिसांकडून व्हायरल व्हिडिओबाबत देखील चौकशी सुरु केली आहे. अमृतसरमध्ये या घटनेमुळं खळबळ उडाली आहे.

संपादकीय लेखणीतून...

## जागतिक प्राणी दिन

'जागतिक प्राणी दिन' निमित्ताने जगभरातील लोक प्राण्यांच्या भल्यासाठी आणि अधिकारांसाठी काम करतात. हा दिवस दरवर्षी ४ ऑक्टोबर रोजी साजरा केला जातो. जागतिक प्राणी दिनाचे ध्येय जगभरातील प्राण्यांसाठी, कल्याणासाठी आणि त्यांच्या राहण्याचा दर्जा सुधारणे आणि जगातील सर्व प्राण्यांसाठी एक चांगले स्थान निर्माण करण्यासाठी कार्य करणे हे आहे.

जागतिक प्राणी दिन का साजरा केला जातो? : प्राण्यांवरील क्रूरता आणि अत्याचार रोखण्यासाठी आणि प्राण्यांचे हक्क आणि कल्याण याबद्दल लोकांना जागरुक करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर दरवर्षी ४ ऑक्टोबर रोजी 'जागतिक प्राणी दिन' साजरा केला जातो.

पहिला जागतिक प्राणी दिवस कधी साजरा करण्यात आला? : जागतिक प्राणी दिन प्रथम ४ ऑक्टोबर १९२९ रोजी साजरा करण्यात आला. तो जर्मन लेखक आणि प्रकाशक हेनरिक झिमरमन यांनी प्राण्यांच्या कल्याणाविषयी जागरूकता वाढवण्याच्या उद्देशाने सुरू केला होता. २४ मार्च १०२५ रोजी जागतिक प्राणी दिनाचे आयोजन हेनरिक झिमरमन (१८८७-१९४२) नावाच्या जर्मनने लेखकाने केले होते. ते केवळ लेखकच नव्हते तर, एक द्वि-मासिक प्रकाशक देखील होते. Mensch und Hund/Man And Dog या नावाने त्यांनी मासिकाचा उपयोग प्राणी कल्याणाविषयीच्या त्यांच्या विचारांना चालना देण्यासाठी आणि जागतिक प्राणी दिन समिती स्थापन करण्यासाठी माध्यम म्हणून केला. २४ मार्च १९२५ रोजी त्यांच्या समितीने जागतिक प्राणी दिनाचे आयोजन केले. जर्मनीतील बर्लिन येथील स्पोर्ट्स पॅलेसमध्ये त्यांनी त्यावेळच्या प्राणी कल्याणविषयक समस्यांबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी त्याचे आयोजन केले आणि पहिल्या कार्यक्रमात सुमारे ५००० लोकांनी भाग घेतला. आणि हा कार्यक्रम असिसीच्या सेंट फ्रान्सिसच्या मेजवान्यासह चिन्हांकित करण्यात आला जो ४ ऑक्टोबर रोजी होता. असिसीच्या फ्रान्सिसने त्याच्या आजूबाजूच्या प्राण्यांची दुर्दशा स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली होती आणि त्यांना त्यांच्या वेदना दूर करायच्या होत्या. पुढील काही वर्षांमध्ये हा कार्यक्रम दरवर्षी आयोजित करण्यात आला आणि १९२९ मध्ये तो ४ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आला. आणि शेवटी मे १९३१ मध्ये ४ ऑक्टोबर हा जागतिक प्राणी दिवस म्हणून साजरा करण्याचा ठराव फ्लोरेन्स इटलीतील आंतरराष्ट्रीय प्राणी संरक्षण काँग्रेसने स्वीकारला. तेव्हापासून आज जगभरात प्राण्यांच्या भल्यासाठी जागतिक प्राणी दिन साजरा केला जातो. आणि २००३ मध्ये नेचरवॉच फाउंडेशनने जागतिक प्राणी दिनानिमित्त एक वेबसाइट सुरू केली.

जागतिक प्राणी दिन का साजरा केला जातो?: जागतिक प्राणी संरक्षण दिन हा प्राणी वाचवण्यासाठी आणि त्यांच्याबद्दल जनजागृती करण्यासाठी साजरा केला जातो. त्याचबरोबर प्राण्यांवरील मानवी क्रूरता रोखणे, निसर्गाने प्राण्यांसाठी निर्माण केलेल्या जंगलांचे जतन करणे, प्राण्यांच्या भावनांचा आदर करणे, प्राण्यांची स्थिती सुधारणे, पशुवैद्यकीय औषध आणि संवर्धनाचा प्रचार, नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या प्रजातींना वाचवण्यासाठी, वन्यजीवांवर नियंत्रण ठेवणाऱ्या प्राण्यांनाही मानवासारखे जीवन असते, त्यामुळे तेही आदरास व चांगले जीवन जगण्यास पात्र असतात.

जागतिक प्राणी दिन जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे साजरा केला जातो आणि अनेक कार्यक्रम आणि उपक्रमही आयोजित केले जातात. या दिवशी अनेक प्राणी जनजागृती कार्यक्रम, प्राणी क्रूरता आणि छळ थांबवण्यासाठी मोहीम आणि मॅरेथॉन इत्यादींचे आयोजन केले जाते. यासोबतच पाळीव प्राणी दत्तक घेणे, बेघर प्राण्यांना आश्रय देणे अशी कामेही केली जातात, पाळीव प्राणी आणि त्यांच्या प्राण्यांसाठी काही मदतही केली जाऊ शकते. एवढेच नव्हे तर प्राण्यांसाठी बनवलेले कायदे लोकांना माहीती व्हावेत यासाठी प्राणी संघटनांच्या वतीने अनेक परिषदा आणि परिसंवादही आयोजित केले जातात. माणूस हा अगदी सुरुवातीपासूनच अतिशय स्वार्थी प्राणी आहे. ज्याने सर्व मयार्दा ओलांडून पृथ्वीचे शोषणही केले आहे. आज मानवाने पृथ्वीवर असलेले अनेक प्राणी आणि नैसर्गिक घटक तसेच अनेक झाडे आणि वनस्पती नष्ट केल्या आहेत. अनेक प्रजाती नामशेष झाल्या आहेत, तर काही नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. या सर्वांबाबत ठोस पावले उचलली नाहीत, तर लवकरच पृथ्वीवरील मानवाचे जीवनही संपुष्टात येईल. अशा परिस्थितीत पृथ्वीवरील संतुलन राखण्यासाठी प्राणी व वनस्पती यांच्यात संतुलन राखणे आवश्यक आहे.

# सेवाग्राम-वर्ध्याच्या पत्रकारितेची शंभर वर्षांची कहाणी...

**ग्रंथ समीक्षा**
**प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल, वर्धा**

स्वातंत्र्यलढ्यात वर्धा-सेवाग्रामने विचारांना दिशा दिली; त्या विचारांना समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकारितेने केले. त्या अक्षरप्रवासाची शंभर वर्षांची साक्ष म्हणजे पत्रकार राजेश मडावी यांचा 'शताब्दीची साक्ष : वर्धा-सेवाग्रामची पत्रकारिता (१८८६-१९८६)' हा ग्रंथ. १०० वर्षांतील जुन्या नियतकालिकांच्या पानांतून देश घडविणाऱ्या एका प्रदेशाचा सामाजिक, वैचारिक आणि तेजस्वी पत्रकारितेचा इतिहास या पुस्तकातून उलगडतो.

### वर्धा लहरीपासून सुरू झालेली अक्षरयात्रा

शंभर वर्षांच्या पत्रकारितेचा मागोवा घेणे म्हणजे केवळ जुनी वर्तमानपत्रे शोधणे नव्हे; त्या पानांमागची माणसे, त्यांचे विचार आणि तत्कालीन समाजजीवन समजून घेणे होय. मडावी यांनी हे आव्हान स्वीकारताना १८८६ या वर्षापासून हा मागोवा सुरू केला आहे. नारायण थोरात यांचे 'वर्धा लहरी' साप्ताहिक आणि केशव जोरवेकर यांचे 'न्यायदर्पण' मासिक या दोन नोंदी वर्ध्याच्या पत्रकारितेच्या आरंभीच्या टप्प्याची साक्ष देतात.

त्यानंतर १८९७ मधील जिनदास चवडे यांचे 'जैन भास्कर' साप्ताहिक, १९१२ मधील दत्तात्रय रणदिवे यांचे 'सुमती' पाक्षिक आणि १९२३ मधील आचार्य विनोबा भावे यांचे 'महाराष्ट्र धर्म' मासिक असा हा प्रवास पुढे जातो. याच काळात गोपाळराव काळे यांचे 'महाराष्ट्र धर्म' साप्ताहिक, सत्यदेव विद्यालंकार यांचे 'राजस्थान केसरी' दैनिक, भवानी प्रसाद मिश्र यांचे 'महिलाश्रम' त्रैमासिक, व्यंकटराव गोडे आणि काशिनाथ धनुस्कर यांच्याशी संबंधित 'ब्राह्मणेतर' साप्ताहिक अशी विविध नियतकालिके पत्रकारितेच्या पटावर दिसतात.

१९३३ मध्ये निळकंठराव देशमुख यांचे 'सुबोधमाला' मासिक, कृष्णदास गांधी यांचे 'महाराष्ट्र खादी' आणि 'खादी जगत', तर १९३५ मध्ये पतितपावनदास यांचे 'पतितपावन' साप्ताहिक अशी भर पडते. या प्रकाशनांकडे पाहिले की वर्ध्याची पत्रकारिता एका विषयापुरती मर्यादित नव्हती, हे लक्षात येते. सामाजिक सुधारणा, लोकशिक्षण, खादी, स्त्रीप्रश्न, जातीय विषमता, स्वातंत्र्य आणि ग्रामीण जीवन अशा अनेक प्रश्नांचे प्रतिबिंब तिच्यात उमटत गेले. या पत्रकारितेची व्यापक पूर्वपीठिका सांगताना आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दर्पण' आणि 'दिग्दर्शन'चा संदर्भही ग्रंथात येतो. जांभेकरांचे कार्य वर्ध्यात झाले नसले तरी आधुनिक पत्रकारिता आणि सामाजिक प्रबोधनाची जी परंपरा त्यांनी निर्माण केली, तिचे पडसाद पुढील पत्रकारितेत उमटले.

### सेवाग्राम आणि पत्रकारितेचा मूल्यविचार

वर्धा-सेवाग्रामचा पत्रकारितेचा इतिहास महात्मा गांधींच्या कार्यापासून वेगळा करता येत नाही. १९३६ नंतर सेवाग्राम हे राष्ट्रीय चळवळ, रचनात्मक कार्य आणि सामाजिक परिवर्तनाचे महत्त्वाचे केंद्र बनले. या वातावरणात पत्रकारितेची भूमिका केवळ घटना सांगण्यापुरती राहिली नाही; ती लोकशिक्षण आणि जनजागृतीचे माध्यम बनली.

गांधीजींनी हरिजन, हरिजन सेवक आणि हरिजन बंधू या नियतकालिकांच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न आणि सार्वजनिक जीवनातील मूल्यांची मांडणी केली. त्यांची भाषा साधी, थेट आणि सामान्य माणसाला समजणारी होती. पत्रकारिता ही लोकांशी संवाद साधण्याची आणि समाजाला विचार करण्यास प्रवृत्त करण्याची शक्ती आहे, हा दृष्टिकोन त्यांच्या कार्यातून दिसतो.

वर्धा-सेवाग्रामच्या पत्रकारितेनेही सत्य, अहिंसा, स्वावलंबन, ग्रामस्वराज्य, खादी आणि सामाजिक समता यांसारख्या मूल्यांना आपल्या लेखनातून स्थान दिले. शेतकरी, कष्टकरी, स्त्रिया, दलित, ग्रामीण आणि उपेक्षित समाज यांच्या प्रश्नांना या पत्रकारितेने व्यासपीठ मिळवून दिले. ब्रिटिशविरोधी आंदोलनाच्या काळात वृत्तपत्रे ही माहितीची साधने तर होतीच; त्याचबरोबर लोकजागृती आणि वैचारिक संघर्षाची माध्यमेही होती.

ग्रंथातील भारतीय स्वातंत्र्याचा वर्धा ठराव आणि प्रसार माध्यमे, देशभरातील वृत्तपत्रे सेवाग्राम-वर्ध्यात आणि देश-विदेशातील व्यंगचित्रांत उमटलेला वर्धा-सेवाग्राम ही प्रकरणे या संबंधाचा विस्तृत पट उलगडतात.

स्वातंत्र्यलढ्याच्या राजकीय इतिहासासोबत त्यामागे चाललेल्या वैचारिक हालचाली समजून घेण्यासाठी ही मांडणी उपयुक्त ठरते.

### सत्यशोधक आणि आंबेडकरी विचारांची पत्रकारिता

वर्धा-सेवाग्रामच्या पत्रकारितेचा इतिहास केवळ गांधी-विनोबा विचारांच्या परिघात पूर्ण होत नाही. सत्यशोधक आणि आंबेडकरी विचारांची पत्रकारिता हा त्यातील महत्त्वाचा सामाजिक प्रवाह आहे. ब्राह्मणेतरसारख्या नियतकालिकांची नोंद आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सेवाग्राम (१ मे १९३६) हे प्रकरण या प्रवाहाचे महत्त्व अधोरेखित करते.

सत्यशोधक परंपरेने सामाजिक विषमता आणि जातिभेदावर प्रश्न उपस्थित केले, तर आंबेडकरी पत्रकारितेने समता, स्वाभिमान, सामाजिक न्याय आणि वंचितांच्या हक्कांना वैचारिक धार दिली. या पत्रकारितेने समाजातील उपेक्षित घटकांना आपले प्रश्न मांडण्यासाठी शब्द आणि व्यासपीठ दिले. त्यामुळे पत्रकारिता ही केवळ राजकीय घडामोडींची नोंद ठेवणारी व्यवस्था न राहता सामाजिक परिवर्तनाचे साधन बनली. गांधींचे लोकशिक्षण, विनोबांचा ग्रामविचार आणि फुलेझ्रआंबेडकरांच्या सामाजिक समतेच्या विचारांची ही विविध प्रवाहांतील वाटचाल वर्धा परिसराच्या पत्रकारितेला व्यापक आशय देते. या विविध विचारप्रवाहांचा एकत्रित मागोवा

**ग्रंथ** : शताब्दीची साक्ष : वर्धा-सेवाग्रामची पत्रकारिता (१८८६-१९८६)
**लेखक** : राजेश मडावी
**प्रकाशक** : स्तंभ पब्लिशिंग हाऊस, चंद्रपूर, ८०८०६५४३०६




घेणे हे या ग्रंथाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

### विदर्भाच्या पत्रकारितेचा समृद्ध वारसा

वर्ध्याची पत्रकारिता विदर्भाच्या व्यापक पत्रकारिता परंपरेपासून वेगळी नव्हती. मडावी यांनी या परस्परसंबंधाचा मागोवा घेताना महाराष्ट्र, नागपूर टाइम्स, उदय, सुराज्य, मातृभूमी, लोकसेवक, हितवाद, नवभारत आणि युगधर्म यांसारख्या प्रकाशनांचा संदर्भ दिला आहे. या वृत्तपत्रांशी संबंधित व्यक्तींमध्ये दादासाहेब ओगले, पु. दी. ढवळे, मा. ज. कानेटकर, अनंत गोपाल शेवडे, ना. रा. बामनगावकर, वामनराव गावंडे, प्रमिलाताई ओक, मा. सां. कन्नमवार, नरेश अप्पाजी द्रविड, ए. डी. मणी, राम गोपाल माहेश्वरी, भगवतीधर वाजपेयी आणि पृथ्वीगीर हरीगीर यांचा उल्लेख येतो. या व्यक्तींच्या कार्यातून वृत्तपत्र हे केवळ प्रकाशन नसून एका विशिष्ट काळातील सामाजिक आणि वैचारिक हस्तक्षेपाचे माध्यम होते, हे स्पष्ट होते.

'जैन भास्कर'च्या निमित्ताने चवडे बंधूंचे पत्रकारितेसोबत जैन संगीत नाट्यसृष्टीशी असलेले नाते आणि प्राचीन जैन मराठी ग्रंथांच्या प्रकाशनातील वर्ध्याचे योगदानही समोर येते. त्यामुळे पत्रकारितेचा इतिहास साहित्य आणि सांस्कृतिक इतिहासाशी कसा जोडला जातो, याचेही दर्शन घडते.

### लघु नियतकालिके : विचारांची छोटी, पण विचारपीठे

१९५०-६०च्या दशकातील लघु नियतकालिकांचा इतिहास हा ग्रंथाचा महत्त्वाचा भाग आहे. पां. वा. गाडगीळ, बाबा दळवी आणि प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या लेखनासोबत वसंत आबाजी डहाके, मनोहर सप्रे, मनोहर टोंगे, अनंत अहमदाबादकर, वामन तेलंग, यशवंत मनोहर, वा. ना. देशपांडे, नारायण कुलकर्णी-कवठेकर, मनराज पटले, लखनसिंह कटरे, गजानन डांबरे, देवका देशमुख, विजय देशमुख, विठ्ठल वाघ, गिरीश गांधी अशा साहित्यिक, कवी आणि संपादकांच्या कार्याची नोंद यात आहे. लघु नियतकालिकांची ताकद त्यांच्या आकारात नव्हती, तर त्यांच्या वैचारिक धारेत होती. मुख्य प्रवाहातील पत्रकारितेबाहेरचे साहित्य, नव्या कल्पना आणि सामाजिक अस्वस्थता यांना त्यांनी व्यासपीठ दिले. त्यामुळे पत्रकारिता आणि साहित्य यांच्यातील नाते या ग्रंथातून अधिक ठळक होते.

ग्रंथाच्या दुसऱ्या विभागातील पंडित नेहरू आणि सालोड ग्रामपंचायत, जमनालाल बजाज आणि हिंदी केसरी, दा. न. शिखरे आणि साप्ताहिक अग्रणी, बलराज साहनी आणि नई तालीम, मार्जोरी साईक्स आणि नई तालीम हे लेख वर्ध्याच्या पत्रकारितेचा संबंध सामाजिक आणि शैक्षणिक चळवळींशी जोडतात.

परिशिष्टात शाबास मास्तरीण बाई!, महाड येथे सत्याग्रहाला सुरुवात होणार, शेतकऱ्यांचा प्रश्न कसा सुटेल?, महात्मा गांधींचे वैशिष्ट्य, सेवाग्राम आश्रमातील विवाहाची अपूर्वाई, महाराष्ट्र राज्याची निर्मिती यांसारख्या नोंदी आहेत. आचार्य विनोबा भावे यांचा पत्रकारांचे महत्त्व मान्य; पण पत्रांची प्रतिष्ठा वाढवा हा दुर्मिळ लेख आणि पत्रकारिता : काल, आज आणि उद्या, ही संपादक सुरेश द्वादशीवार यांची मुलाखत वर्तमान पत्रकारितेशीही संवाद साधते. वर्धा जिल्ह्यातील शासनमान्य मध्यम व लघु वर्तमानपत्रांची यादी संशोधकांसाठी स्वतंत्र संदर्भमूल्य ठेवते.

### इतिहासाची नोंद, केवळ भूतकाळाचे स्मरण नव्हे

३५२ पृष्ठांच्या या ग्रंथासाठी १६३ संदर्भग्रंथांचा आधार घेतला आहे. त्यामुळे हा केवळ आठवणींचा किंवा व्यक्तिचित्रांचा संग्रह न राहता संशोधनाधारित दस्तऐवज बनतो. जुनी छायाचित्रे, दस्तावेज, नियतकालिकांची माहिती आणि संपादकांची नावे यामुळे विस्मृतीच्या पडद्याआड जाणारा पत्रकारितेचा इतिहास वाचकांसमोर पुन्हा उभा राहतो.

आज पत्रकारितेचे माध्यम बदलले आहे. बातमीचा वेग वाढला आहे, माध्यमांचे स्वरूप बदलले आहे आणि माहितीच्या विश्वात नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. अशा वेळी शंभर वर्षांपूर्वीच्या पत्रकारितेकडे पाहणे म्हणजे भूतकाळाचे केवळ स्मरण करणे नव्हे; पत्रकारितेच्या सामाजिक जबाबदारीचा पुन्हा विचार करणे होय.

शताब्दीची साक्षची खरी ताकद याच ठिकाणी आहे. १८८६च्या वर्धा लहरीपासून सुरू झालेला हा अक्षरप्रवास १९८६पर्यंत येतो; पण त्यातून उपस्थित होणारे प्रश्न आजही जिवंत आहेत. वर्धा-सेवाग्रामच्या भूमीने स्वातंत्र्यलढ्याला विचार दिला आणि पत्रकारितेने त्या विचारांना शब्द दिले. गांधी-विनोबांच्या लोकशिक्षणाच्या विचारांपासून सत्यशोधक आणि आंबेडकरी सामाजिक जाणिवांपर्यंतचा हा प्रवास एका प्रदेशाच्या वैचारिक इतिहासाची महत्त्वाची नोंद ठरतो. पत्रकारिता, इतिहास, साहित्य आणि सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करणाऱ्या वाचकांसाठी हा ग्रंथ त्यामुळे एक उपयुक्त संदर्भदस्तऐवज ठरला आहे.

# भारताचे सलग दुसरे सुवर्ण तर पाकचे स्वप्न भंगले!

**डॉ. दत्ता विघावे**
**क्रिकेट समिक्षक**

भारतीय पुरुष क्रिकेट संघाने पाकिस्तानला १९ धावांनी पराभूत करून सुवर्णपदक जिंकले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील पुरुष क्रिकेट स्पर्धेत टीम इंडियाचे हे दुसरे सुवर्णपदक आहे. यापूर्वी २०२२ मध्ये, टीम इंडियाने अंतिम सामन्यात श्रीलंकेला पराभूत करून सुवर्णपदक जिंकले होते. विजेतेपदाच्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २० षटकांत ६ गडी गमावून २११ धावा केल्या. २१२ धावांच्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना पाकिस्तान केवळ १९२ धावाच करू शकला.

### आशियाई क्रीडा स्पर्धेत १९ वे सुवर्णपदक

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२६ मधील भारताचे हे १९ वे सुवर्णपदक असून भारतीय संघाचे क्रिकेटमधील हे दुसरे सुवर्णपदक आहे. यापूर्वी, महिला संघाने श्रीलंकेला पराभूत करून सुवर्णपदक राखले होते.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर भारतीय संघाची सुरुवात संमिश्र झाली. वैभव सूर्यवंशी अवघ्या १५ धावांवर बाद झाला. संजू सॅमसनला केवळ २ धावा करता आल्या. कर्णधार श्रेयस अय्यर २४ चेंडूंमध्ये २१ धावा करून बाद झाला. ईशान किशनला आपल्या चांगल्या सुरुवातीचा फायदा उठवता आला नाही आणि तो १८ चेंडूंमध्ये २० धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. मात्र, अभिषेकने एका टोकाकडून शानदार फलंदाजी करत केवळ २८ चेंडूंचा सामना करून ६१ धावांची दमदार खेळी केली. या खेळीत अभिषेकने ३ चौकार आणि ७ षटकार मारले.

दरम्यान, उपकर्णधार तिलक वर्मा उत्कृष्ट फॉर्ममध्ये होता आणि त्याने केवळ २२ चेंडूंमध्ये नाबाद ५१ धावा केल्या. तिलकने आपल्या खेळीत ३ चौकार आणि ४ षटकार मारले. त्याने, शिवम दुबे (२७ धावा) सोबत सहाव्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी करून भारताला २०० धावांचा टप्पा ओलांडण्यास मदत केली. पाकिस्तानकडून अहमद दानियाल आणि अराफत मिन्हास यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. अंतिम सामना गमावूनही, पाकिस्तानने रौप्य पदक मिळवण्यात यश मिळवले.

### खराब सुरुवातीनंतर डाव सावरला

लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवात खराब झाली. साहिबजादा फरहान फलंदाजीत चांगली कामगिरी करू शकला नाही आणि ११ चेंडूंत १० धावांवर बाद झाला. उस्मान खानही अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर केवळ ३ धावांवर बाद झाला. माझ सदाकत चांगल्या सुरुवातीचा फायदा उठवू शकला नाही आणि १८ चेंडूंत २३ धावांवर बाद झाला.

३९ धावांत तीन गडी गमावल्यानंतर अडचणीत आलेला पाकिस्तानचा डाव हसन नवाझ आणि सॅम अयुब यांनी सावरला. त्यांनी ४८ चेंडूंत चौथ्या विकेटसाठी ८७ धावांची भागीदारी केली. २९ धावा केल्यानंतर अयुब शिवम दुबेच्या गोलंदाजीवर बाद झाला. मात्र, हसनने एका टोकाकडून आपली प्रभावी फलंदाजी सुरू ठेवत झटपट अर्धशतक पूर्ण केले.



हसन नवाझने ५१ चेंडूंमध्ये ९६ धावांची शानदार खेळी केली, पण तो पाकिस्तानला विजय मिळवून देऊ शकला नाही. त्याने आपल्या खेळीत ५ चौकार आणि ७ षटकार मारले. भारताकडून अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

### वैभवचा प्रकाश अंधुक

तिसऱ्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर, सॅम अयुबच्या गोलंदाजीवर वैभव सूर्यवंशी यष्टीमागे उस्मान खानकरवी झेलबाद झाला आणि पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याने आपल्या खेळीत २ षटकार मारले होते. ९ चेंडूंचा सामना करत १५ धावा करून तो बाद झाला. यापूर्वी, उपांत्य फेरीच्या सामन्यात श्रीलंकेविरुद्ध तो मोठी खेळी करू शकला नव्हता. सूर्यवंशी व्यतिरिक्त, संजू सॅमसनही आशियाई क्रीडा स्पर्धेत अपयशी ठरला. आशियाई क्रीडा स्पर्धेपुर्वी जपानविरुद्ध खेळल्या गेलेल्या एकमेव सामन्यात संजूने ७ धावा केल्या होत्या, तर श्रीलंकेविरुद्ध तो केवळ ७ धावा करून बाद झाला होता.

या अविस्मरणीय सामन्यात, भारतीय क्रिकेटपटू अभिषेक शमार्ने मैदानाच्या सर्व बाजूंनी आकर्षक फटके मारत शानदार फलंदाजी केली. धमाकेदार अर्धशतक झळकावून त्याने आपल्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोचला. खरे तर, अभिषेक शमार्ने पाकिस्तानविरुद्ध एका डावात सर्वाधिक षटकार मारण्याच्या युवराज सिंगच्या विक्रमाची बरोबरी केली. दोन्ही फलंदाजांनी पाकिस्तानविरुद्ध एका डावात प्रत्येकी सात षटकार मारले. अभिषेक शर्माने पाकिस्तानविरुद्ध अवघ्या २८ चेंडूंमध्ये तीन चौकार आणि सात षटकारांसह ६१ धावांची शानदार खेळी केली.

### भारत-पाकिस्तान टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये एका डावात सर्वाधिक षटकार

युवराज सिंग ७ अहमदाबाद २०१२, अभिषेक शर्मा ७ निशिन २०२६, अभिषेक शर्मा ५ दुबई २०२५. भारत-पाकिस्तान टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये पहिल्या डावातील सर्वोच्च धावसंख्या.

२०२६ आशियाई क्रीडा स्पधेर्तील पुरुषांच्या क्रिकेट सुवर्णपदकाच्या सामन्यात भारतीय फलंदाजांनी शानदार कामगिरी केली. अभिषेक शर्मा आणि तिलक वर्मा यांनी झटपट अर्धशतके झळकावली, ज्यामुळे भारताने पाकिस्तानविरुद्ध २० षटकांत ६ गडी गमावून २११ धावा केल्या. टी२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पाकिस्तानविरुद्ध प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाची ही सर्वोच्च धावसंख्या आहे.

### श्रीलंकेला कास्यंपदक

२०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेच्या पुरुष क्रिकेट स्पधेर्तील कांस्यपदकाच्या सामन्यात श्रीलंकेने बांगलादेशचा ६३ धावांनी पराभव केला. २०२२ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतील कांस्यपदक विजेता बांगलादेश यावेळी रिकाम्या हाताने परतणार आहे, तर श्रीलंकेने गेल्या वेळी रौप्यपदक जिंकले होते आणि आता त्यांना कांस्यपदक मिळेल. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेच्या संघाने ९ गडी गमावून २० षटकांत १६५ धावा केल्या. प्रत्युत्तरात, बांगलादेशचा संपूर्ण संघ २० षटकेही टिकू शकला नाही आणि १८ व्या षटकात १०२ धावांवर सर्वबाद झाला.

श्रीलंकेची सुरुवात खराब झाली आणि त्यांनी अवघ्या २१ धावांत चार गडी गमावले. श्रीलंकेचा पाचवा गडी ५४ धावांवर पडला, पण कर्णधार साहन अर्चिगे आणि थरिंदू रत्नायके यांच्या शानदार फलंदाजीमुळे श्रीलंकेला १६५ धावांपर्यंत मजल मारता आली. असे असूनही, आठ फलंदाज दुहेरी आकडा गाठण्यात अपयशी ठरले. बांगलादेशकडून मेहिदी हसन, सैफ हसन आणि मुस्तफिजुर रहमान यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले, तर अलीस अल इस्लाम आणि रिशाद हुसेन यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

१६६ धावांचे लक्ष्य गाठताना बांगलादेशचीही सुरुवात खराब झाली. सैफ हसन, तन्झिद हसन आणि कर्णधार लिटन दास हे शून्यावर बाद झाले. बांगलादेशने अवघ्या चार धावांत तीन गडी गमावले आणि तौहीद हृदोयही १८ धावांवर बाद झाला. चार षटकांच्या आतच बांगलादेशचा संघ गडबडला आणि त्यांचे चार फलंदाज तंबूत परतले. यानंतरही विकेट्स पडतच राहिल्या. नासुम अहमद नवव्या क्रमांकावर फलंदाजीला आला आणि त्याने २६ धावा केल्या, पण संघाच्या विजयासाठी ते पुरेसे नव्हते. त्याच्या बाद होण्याने बांगलादेशचा डाव संपला.

बांग्लादेशच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण म्हणजे त्यांच्या आघाडीच्या फळीचे अपयश आणि त्यानंतर भागीदारी करण्यात आलेले अपयश. श्रीलंकेची आघाडीची फळीही कोसळली, पण दोन फलंदाजांनी सामन्याचे चित्र पालटले.

- ९०९६३७२०८२.

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# निस्वार्थपणे सेवा काम करणाऱ्या संस्थांना समाजासमोर आणण्याची ग्रामायणची भूमिका प्रेरणादायी

## कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी केले कौतुक, तिसऱ्या अभ्युदय सेवा प्रदर्शनाचे उद्घाटन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

केवळ समाजकार्याबद्दल बोलणे सोपे असते; मात्र कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता प्रत्यक्ष समाजात काम करून परिवर्तन घडवून आणणे ही मोठी गोष्ट आहे. अभ्युदय सेवा प्रदर्शनात सहभागी झालेल्या विविध सामाजिक संस्थांच्या कार्यातून याचे जिवंत उदाहरण पाहायला मिळते, असे प्रतिपादन नागपूर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी केले. सेवाभावी संस्था, दाते, नागरिक, विद्यार्थी, स्वयंसेवक, तज्ज्ञ आणि उद्योग क्षेत्र यांना एका व्यासपीठावर आणून सामाजिक सेवेला बळ देण्याच्या उद्देशाने ग्रामायण प्रतिष्ठानतर्फे आणि सर गंगाधरराव चिटणवीस मेमोरियल मेडिकल रिसर्च ट्रस्टच्या सहकार्याने 'तिसरे अभ्युदय सेवा प्रदर्शन-दान महोत्सव २०२६' आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन २, ३ आणि ४ ऑक्टोबर २०२६ रोजी चिटणवीस सेंटर, सिव्हिल लाईन्स, नागपूर येथे होणार आहे. प्रदर्शन नागरिकांसाठी दररोज दुपारी ३ ते रात्री ९ वाजेपर्यंत खुले राहणार आहे. प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या मार्गदर्शन करत




होत्या. यावेळी इन्फोसेप्ट्स डेटा आणि एआय,चे प्रशासन, सीएसआर आणि ईएसजी ग्लोबल हेड सुनील नरवारे, ग्रामायण प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल सांबरे, चिटणवीस सेंटर ट्रस्टी नीतातार्इ काळे, ग्रामायणचे उपाध्यक्ष चंद्रकांत रागीट, सचिव संजय सराफ यांची उपस्थिती होती.

कुलगुरू मनाली क्षीरसागर म्हणाल्या की, समाजातील अनेक संस्था प्रसिद्धीपासून दूर राहून आपल्या पातळीवर सातत्याने सेवाकार्य करीत आहेत. एकल व विधवा महिलांची काळजी घेणे, बौद्धिक दिव्यांग व्यक्ती, प्रौढ दिव्यांग व्यक्ती, महिला, लहान मुले आणि अनाथ मुलांसाठी काम करणे, तसेच नशामुक्तीसाठी प्रयत्न करणे, अशा विविध क्षेत्रांत सेवाभावी संस्था कार्यरत आहेत. या सर्वांचे कार्य पाहून आनंद आणि अभिमान वाटतो, असे त्यांनी सांगितले.

सेवा सर्वदा, ही भावना ग्रामायणच्या कार्याशी सुसंगत असल्याचे सांगत क्षीरसागर यांनी ग्रामायणच्या कार्याचे कौतुक केले. विविध सामाजिक संस्थांना एकत्र आणून त्यांच्या कायार्ला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात ग्रामायणची महत्त्वाची भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी सामाजिक क्षेत्रातील उपक्रमांना शैक्षणिक संस्थांची जोड मिळण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. मुंबई विद्यापीठाच्या धर्तीवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सोशल वर्क विभागासोबत ग्रामायणने सहकार्य वाढवावे, अशी सूचना त्यांनी केली.

**ग्रामायणने सामाजिक संस्थांना दिलेले व्यासपीठ कौतुकास्पद : सुनील नरवारे**

समाजातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांना एकत्र आणून त्यांच्या कार्याला व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे ग्रामायण प्रतिष्ठानचे कार्य उल्लेखनीय आहे. सामाजिक संस्था आणि त्यांना सहकार्य करू इच्छिणारे दाते यांच्यातील दुवा म्हणून ग्रामायण महत्त्वाची भूमिका बजावत आहे, असे प्रतिपादन यावेळी इन्फोसेप्ट्स डेटा आणि एआय,चे प्रशासन, सीएसआर आणि ईएसजी ग्लोबल हेड सुनील नरवारे यांनी केले.

प्रास्ताविक करताना ग्रामायण प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल सांबरे म्हणाले, समाजपरिवर्तनासाठी विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या छोट्या संस्था, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध समूहांना एकत्र आणून त्यांचे कार्य समाजासमोर आणणे, त्यांना सक्षम करणे आणि त्यांच्या कार्याला समाजाचे पाठबळ मिळवून देणे, हा ग्रामायण प्रतिष्ठानच्या कायार्चा प्रमुख उद्देश आहे. या कार्यात विविध NGO, सेवा संस्था, शैक्षणिक क्षेत्र, तज्ज्ञ व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, उद्योगजगत आणि समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. विविध क्षेत्रातील अनुभव, ज्ञान आणि कौशल्य



एकत्र आल्यास समाजाच्या विकासासाठी अधिक प्रभावी काम उभे राहू शकते, असा विश्वासही सांबरे यांनी व्यक्त केला.

सामाजिक संस्थांना केवळ आर्थिक मदत मिळवून देणे हा ग्रामायणचा उद्देश नसून, संबंधित संस्था आणि सामाजिक कार्यकर्त्यांची क्षमता वाढवून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी सक्षम करणे आवश्यक आहे, अशी भूमिका ग्रामायण प्रतिष्ठानच्या वतीने सचिव संजय सराफ यांनी मांडली. ग्रामायणच्या माध्यमातून विविध सामाजिक संस्था आणि कार्यकर्त्यांना एकत्र आणण्यामागे त्यांना समाजाचे पाठबळ मिळवून देण्याचा उद्देश आहे. मात्र केवळ दाता आणि गरजू यांना एकत्र आणून मागण्या पूर्ण करण्यापुरते हे कार्य मर्यादित राहू नये, यासाठी क्षमतावर्धनाच्या उपक्रमांवर विशेष भर देण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. या उद्घाटन सोहळ्याचे संचालन सोनू जेसवानी यांनी केले. विविध भागांतून आलेले सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध उपक्रमांमध्ये सहभागी संस्था उपस्थित होत्या.

**उत्कृष्ट तीन संस्थांना इन्फोसेप्ट्स फाउंडेशनकडून प्रत्येकी लॅपटॉप देण्याची घोषणा**

अभ्युदय सेवा प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व सामाजिक संस्थांना सहकार्य करण्याची इच्छा व्यक्त करत, संसाधनांच्या मर्यादेमुळे यंदा ग्रामायण प्रतिष्ठानकडून निवडण्यात येणाऱ्या उत्कृष्ट तीन संस्थांना इन्फोसेप्ट्स फाउंडेशनच्या वतीने प्रत्येकी एक लॅपटॉप देण्यात येणार असल्याची घोषणा इन्फोसेप्ट्स डेटा आणि एआय,चे प्रशासन, सीएसआर आणि ईएसजी ग्लोबल हेड सुनील नरवारे यांनी केली. यावेळी त्यांनी सांगितले.

## जिल्हा परिषद प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल, भोवरी येथे गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

शुक्रवारला जिल्हा परिषद प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल, भोवरी येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. मुख्याध्यापिका कुमारी पठाण तब्बसूम अयुबखान यांनी विद्यार्थ्यांना गांधीजींच्या सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेचे विचार सांगितले. तसेच लाल बहादूर शास्त्री यांच्या "जय जवान, जय किसान" या घोषवाक्याचे महत्त्व पटवून दिले. जयंती निमित्त शाळेत स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' या संकल्पनेतून सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी शाळेचा परिसर, वर्गखोल्या आणि शाळेचे मैदान स्वच्छ केले. विद्यार्थ्यांनी "स्वच्छता हीच सेवा" असा नारा दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी गांधीजींच्या जीवनावर आधारित भाषणे, गाणी आणि घोषवाक्ये सादर केली.

याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अंकुश निरगुळकर, उपाध्यक्ष प्रल्हाद वैद्य, ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ गिहेपुंजे, माता पालक अश्विनी बावणे, निकिता वैद्य, ज्योती वैद्य, ग्रामस्थ श्याम वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी केले.

# गांधींच्या सत्य-अहिंसेचा आणि शास्त्रींच्या साधेपणाचा जागर



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर- धनंजय पांढरे**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा आणि स्वच्छतेच्या विचारांसह माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, प्रामाणिकपणा आणि देशसेवेच्या आदर्शांना उजाळा देत सार्वजनिक बांधकाम विभाग, बल्लारपूर येथे गांधी जयंती आणि लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आदरांजली वाहिली.

कार्यक्रमात उपविभागीय अभियंता संजोग मेंढे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांनी आपल्या आचार-विचारातून देशासमोर आदर्श निर्माण केला.

गांधीजींनी सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने स्वातंत्र्यलढ्याला व्यापक जनआंदोलनाचे स्वरूप दिले, तर शास्त्रीजींनी अत्यंत साध्या जीवनशैलीतून प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेचे उदाहरण घालून दिले. आजच्या काळात त्यांच्या विचारांचे महत्त्व अधिक असून प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात त्यांच्या मूल्यांचा अंगीकार करणे गरजेचे आहे, असे मेंढे यांनी सांगितले.

शासकीय विभागात काम करताना नागरिकांच्या अपेक्षा आणि सार्वजनिक हित लक्षात घेऊन जबाबदारीने काम करणे हीच खरी जनसेवा आहे. आपल्या कामातून समाजाला सुविधा उपलब्ध करून देतानाच कामात पारदर्शकता, शिस्त आणि प्रामाणिकपणा कायम ठेवला पाहिजे, असेही संजोग मेंढे यांनी सांगितले. महापुरुषांचे केवळ जयंती-पुण्यतिथीला स्मरण न करता त्यांच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देणे आवश्यक असल्याचे त्यांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

महात्मा गांधी यांच्या स्वच्छतेच्या विचारांचा संदर्भ देत सार्वजनिक ठिकाणे, कार्यालयीन परिसर आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून नागरिकांच्या सहभागातूनच स्वच्छ आणि सुंदर समाजाची निर्मिती होऊ शकते, असा संदेशही यावेळी देण्यात आला. त्याचप्रमाणे लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा आणि कर्तव्यनिष्ठेचा आदर्श समोर ठेवून प्रत्येकाने आपल्या कार्यक्षेत्रात निष्ठेने योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.

या कार्यक्रमाला बल्लारपूर

### सार्वजनिक बांधकाम विभागात जयंती उत्साहात साजरी

सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे अभियंता वैभव जोशी, अभियंता पवन सावरकर, अभियंता अनिल आंबटकर, अभियंता विनायक काकडे, अभियंता हनीफ कुरेशी यांच्यासह कार्यालयीन कर्मचारी अरविंद कुचनकर, राहुल कुंदोजवार, परिवर्तन वरखेडे, शीतल पोडे, माधवी मेश्राम, हरिदास डंबारे, बावणे, गिरडकर, सौदागर, महेश उईके, प्रसाद कातपातल तसेच पत्रकार राहुल गायकवाड आणि रमेश निषाद उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या कायार्चे स्मरण करून त्यांच्या विचारांना अभिवादन केले. सत्य, अहिंसा, स्वच्छता, साधेपणा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा ही मूल्ये समाजाच्या प्रगतीसाठी आजही तितकीच महत्त्वाची असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. गांधीजी आणि शास्त्रीजींच्या विचारांचा वारसा जपत जबाबदारीने कार्य करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# प्रभात फेरीतून स्वच्छतेचा संदेश; विद्यार्थ्यांसह शिक्षक व मान्यवरांनी हातात झाडू घेऊन गावातील रस्ते केले स्वच्छ

## गांधी-शास्त्री जयंतीनिमित्त नांदच्या पीएमश्री शाळेत स्वच्छता अभियान

**दै. सिंहवाणी वृत्त, नांद अखिल रोडे**

पीएमश्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नांद क्र. २ (मुली) येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी तथा भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त शाळेत महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या देशसेवेतील योगदानावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांची प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवनकार्यावर आधारित भाषणे सादर केली. महात्मा गांधी यांनी सत्य, अहिंसा, स्वच्छता व राष्ट्रसेवेचा दिलेला संदेश तसेच लाल बहादूर शास्त्री यांनी साधेपणा, प्रामाणिकपणा, देशभक्ती आणि कर्तव्यनिष्ठेचा आदर्श देशासमोर ठेवला, याबाबत विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून माहिती दिली.

यानंतर 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' या संदेशाला कृतीची जोड देत शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांनी गावातून प्रभात फेरी काढली. प्रभात फेरीदरम्यान विद्यार्थ्यांनी स्वच्छतेविषयी जनजागृती करणाऱ्या घोषणा देत ग्रामस्थांना परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन केले. विशेष म्हणजे प्रभात फेरीत सहभागी झालेल्या विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांनी हातात झाडू घेऊन गावातील रस्त्यांची स्वच्छता केली. त्यामुळे गांधी जयंतीच्या निमित्ताने स्वच्छतेचा संदेश केवळ भाषणातून न देता प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला.

महात्मा गांधी यांनी स्वच्छतेला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग मानले होते. त्यांच्या स्वच्छतेच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देत विद्यार्थ्यांनी




गावातील सार्वजनिक परिसर स्वच्छ करण्याचा उपक्रम राबविला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा, सामाजिक बांधिलकी, स्वच्छतेची सवय आणि सार्वजनिक परिसराविषयी जबाबदारीची भावना निर्माण होण्यास मदत झाली.

यावेळी सरपंच शितल राजूरकर, उपसरपंच मोहन धारणे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राहुल चुटे, उपाध्यक्ष पूजा ताजने, मुख्याध्यापक कविता चव्हाण, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य जग्गीनाथ द्वारकावासी व नितेश जुम्बाडे, शिक्षक शिला बहादुरे व सुभाष नन्नावरे तसेच शिकाऊ प्रशिक्षणार्थी आचल दंडारे, सलोनी देवतळे, मोना चुटे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गांधी-शास्त्री जयंतीनिमित्त आयोजित या उपक्रमातून महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्यासोबतच 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश गावकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतल्याने संपूर्ण उपक्रमाला सामाजिक व शैक्षणिक स्वरूप प्राप्त झाले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शिक्षक सुभाष नन्नावरे यांनी केले.

### थोडक्यात

## कारवा- बल्लारशाह सफारी गेटचे उद्घाटन : वन्यजीव सप्ताहानिमित्त स्वच्छता मोहीम



**दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर :-(धनंजय पांढरे)**

मध्यचांदा वनविभागातील बल्लारशाह वनपरिक्षेत्रांतर्गत उपक्षेत्र कारवा येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी दोन्ही महापुरुषांना अभिवादन करून आदरांजली वाहण्यात आली. तसेच कारवा-बल्लारशाह पर्यटन सफारी गेटचे उद्घाटन इको टुरिझम बोर्डचे सदस्य प्रकाश धारणे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाला मध्यचांदा वनविभागाचे सहाय्यक वनसंरक्षक (वनी व वन्य) आदेशकुमार शेंडगे, बल्लारशाहचे वनपरिक्षेत्र अधिकारी आर. डी. घोरूडे तसेच संयुक्त वनव्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोद सिडाम उपस्थित होते. सफारी गेटच्या उद्घाटनानंतर आलेल्या पर्यटकांचे पुष्प व मिठाई देऊन स्वागत करण्यात आले. पर्यटकांना कारवा सफारीच्या कॅपचेही वाटप करण्यात आले. यानंतर कारवा-बल्लारशाह पर्यटन सफारीचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. वन्यजीव सप्ताह १ ते ७ ऑक्टोबर तसेच १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान सुरू असलेल्या सेवा संकल्प अभियानाच्या निमित्ताने सफारी गेट परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. वनाधिकारी, वनकर्मचारी, वनमजूर, सफारीचे जिप्सीचालक व गाईड तसेच ग्रामस्थांनी या मोहिमेत सहभाग घेत परिसराची स्वच्छता केली.

यावेळी कारवा येथील जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी स्टडी टेबलचे मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. वन्यजीव सप्ताह व सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आणि ग्रामस्थांना वन, वन्यजीव संवर्धन, संरक्षण तसेच स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्यात आले. वन्यजीवांचे संरक्षण करण्यासाठी नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे यावेळी मार्गदर्शनातून सांगण्यात आले. कार्यक्रमाला कारवा गावातील पुरुष, महिला आणि शालेय विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. कारवा-बल्लारशाह सफारीचे जिप्सीचालक व गाईड तसेच बल्लारशाह वनपरिक्षेत्रातील अधिकारी, वनकर्मचारी आणि वनमजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्षेत्र सहाय्यक पठाण, रामसोच यादव, पोडचेलवार, टेकाम, उमरे, तसेच वनरक्षक येसांबरे, देवगडे, पवार, काळे, अनिल चौधरी, दोडके, दिलीप जाधव, हेपट, कस्तुरे, पर्वतकर, तिवाडे, टोंगे, सुधीर बोकडे, जेनेकर, गेडाम, मोहुर्ले, अंगलवार यांच्यासह सर्व वनरक्षक व रोजंदारी मजुरांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

## पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा



**दै. सिंहवाणी वृत्त, कामठी**

अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत कामठी येथील सेठ केसरीमल पोरवाल कनिष्ठ महाविद्यालयात ३ ऑक्टोबर रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर स्वप्नील दाहात सर तर प्रमुख वक्ते डॉ प्रा महेश जोगी, तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उप प्राचार्य डॉ इप्तिकार हुसेन,प्राध्यापक विश्वनाथ वंजारी पर्यवेक्षक प्राध्यापक नरेंद्र मेंढे व मराठी विभाग प्रमुख डॉ नीता वानखेडे म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नीता वानखेडे यांनी केले कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ.महेश जोगी यांनी याप्रसंगी अभिजात मराठी भाषा गौरव दिन साजरा का केला जातो यावर भाष्य केले.३ ऑक्टोबर २०२४ रोजी आपल्या लाडक्या मराठी भाषेला केंद्र सरकारकडून 'अभिजात भाषा' चा ऐतिहासिक दर्जा मिळाला.या सुवर्णक्षणाच्या स्मरणार्थ ३ ते ९ ऑक्टोबर हा काळ 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' म्हणून साजरा केला जातो. मराठी ही केवळ संवाद साधण्याचे माध्यम नाही, तर तो आपल्या संस्काराचा श्वास आहे. ज्ञानेश्वरांनी प्राकृत मराठीत ज्ञानेश्वरी लिहून ज्ञानाचे दरवाजे सामान्यांसाठी खुले केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजभाषा म्हणून मराठीचा गौरव वाढला. संत साहित्यापासून ते आधुनिक मराठी साहित्यापर्यंत आपली भाषा अत्यंत श्रीमंत आहे.भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेचा जगभरात सन्मान वाढला आहे आता आपली जबाबदारी आहे की आपण दैनंदिन व्यवहारात शुद्ध आणि अभिमानाने मराठी बोलले पाहिजे,असे प्रतिपादन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. स्वप्नील दाहात सर यांनी दैनंदिन जीवनात मराठीचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले. अभिजात मराठी भाषा सप्ताह अंतर्गत दिनांक ३ ऑक्टोंबर ते ९ ऑक्टोबर दरम्यान महाविद्यालयात कविता वाचन, प्रश्नमंजुषा पोस्टर्स कॉम्पिटिशन, निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा व गायन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे संयोजन प्राध्यापक आशिष क्षीरसागर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पौर्णिमा गावंडे तर आभार प्रदर्शन अक्षरा फुल झाले या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

## पारशिवनी येथे महात्मा गांधी जयंती साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

पारशिवनी शहरातील महात्मा गांधी चौक येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती मोठा उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी शहरातील गणमान्य नागरिकासह मोठ्या संख्येत नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते. महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला माल्या अर्पण करुन अभिवादन करण्यात आले यावेळी शाळकरी विद्यार्थांनी भजन, सादर करुन महात्मा गांधी यांना अभिवादन केले.

# अधिकाऱ्यांनी मुख्यालय न सोडता फिल्ड'वर काम करावे !

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचना, दुष्काळाला समर्थपणे सामोरे जाऊ, अकोला येथे दुष्काळग्रस्त परिस्थितीचा घेतला आढावा, सुमारे ३०० नागरिकांची स्वीकारली निवेदने, बँक अधिकारी व सावकारांचा थकबाकीसाठी शेतकऱ्यांकडे तगादा नको

**दै. सिंहवाणी वृत्त, अकोला**
'पंचायत ते पार्लमेंट' आणि 'तलाठी ते मुख्य सचिव' अशी यंत्रणा सतर्क ठेवण्यात आली आहे. अधिकाऱ्यांनी मुख्यालयात न सोडता फिल्ड'वर काम करावे. दुष्काळ कितीही गंभीर असला तरीही शासन शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. कोणीही आत्महत्येसारखा मार्ग निवडू नये, अशी कळकळीची विनंती आहे. दुष्काळी परिस्थितीला



सामोरे जाऊ असा विश्वास महसूलमंत्री तथा दुष्काळ निवारण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यानंतर दुष्काळ निवारण मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अकोला जिल्ह्यातील येवता आणि बाळापूर तालुक्यातील मानकी देगाव आणि पारस या गावांचा दौरा केला. अकोला येथे नागरिकांशी संवाद साधत त्यांनी सुमारे पाचशेहून अधिक निवेदने स्वीकारली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

बावनकुळे म्हणाले, शेतकऱ्यांच्या पिकांचे अचूक पंचनामे पूर्ण झाल्यावर ट्रिगर १ व ट्रिगर २ नुसार केंद्र, राज्य शासन आणि पीक विमा कंपन्यांमार्फत जास्तीत जास्त मदत दिली जाईल. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत सरकार अत्यंत सकारात्मक आहे. केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकार तातडीने पावले उचलत आहे. केंद्राने प्रस्तावाऐवजी थेट आपली पाहणी टीम पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ग्राम महसूल अधिकारी, कृषी अधिकारी आणि ग्रामसेवकांनी स्वतः शेतावर जाऊन अचूक पंचनामे करावेत, त्यावर शेतकऱ्याची सही घ्यावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

### बँक व सावकारांच्या तगाद्यावर बंदी

कर्जाचा हप्ता थकला तरी कोणत्याही बँकेने किंवा खाजगी सावकाराने शेतकऱ्यांना त्रास देऊ नये. तसेच खाजगी सावकारांनी शेतकऱ्यांना वेठीस धरू नये.

### कर्जमाफी व वारस नोंदींचे काम वेगाने

ज्या शेतकऱ्यांना कर्जमाफी झाली आहे मात्र वारसांची नोंद न झाल्यामुळे लाभ मिळाला नाही, त्यांच्या वारस नोंदी तातडीने पूर्ण करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### उपाययोजनाबाबत अधिकाऱ्यांना सूचना

दुष्काळाच्या परिस्थितीची अकोला जिल्ह्यातील येवता आणि बाळापूर तालुक्यातील मानकी देगाव येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. तर पारस येथे लोकांची निवेदने स्वीकारली. आचारसंहिता असल्याने बैठक न घेता यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा करत दुष्काळ परिस्थितीत पुढील काळात घ्यावयाची काळजी आणि नियोजन याबाबत सूचना दिल्या.

---

## थोडक्यात

### एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालयात महात्मा गांधी जयंती उत्साहात साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालय, एकात्मता नगर, जयताळा, नागपूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती विविध उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना सत्य, अहिंसा आणि स्वच्छता या गांधीजींच्या जीवनातील मूलभूत मूल्यांची माहिती देण्यात आली. स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून समजावे यासाठी विद्यार्थ्यांनी शालेय परिसराची स्वच्छता केली. स्वच्छ शाळा, सुंदर शाळा या भावनेतून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. याचबरोबर आनंदी शनिवार या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आकर्षक चित्रे काढून आपल्या कलागुणांना वाव दिला. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळावे, हा या उपक्रमाचा उद्देश होता. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शरद उरकुडे सर यांनी विद्यार्थ्यांना महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याची व देशासाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. गांधीजींनी दिलेला सत्य, अहिंसा, स्वच्छता, साधेपणा आणि शिस्त यांचा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणावा, असे आवाहन त्यांनी केले.
कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक शरद उरकुडे तसेच सहाय्यक शिक्षिका शुभांगी कातुरे, सुनिता गावंडे, धनश्री ढेगेकर आणि सोनम फुंडे यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे महात्मा गांधी जयंतीचा कार्यक्रम ज्ञान, स्वच्छता, कला आणि मूल्यशिक्षणाचा सुंदर संगम ठरला.

### समर्थ रामदास हायस्कूलच्या निशा मथुरेची विभागीय तायक्वांदो स्पर्धेत दमदार कामगिरी

#### प्रथम क्रमांक पटकावत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड, शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा



**दै. सिंहवाणी वृत्त, काचुरवाही - शुभम कामळे**
महाराष्ट्र राज्य अंतर्गत विभागीय कार्यालय, नागपूर यांच्यावतीने विभागीय क्रीडा संकुल, मानकापूर, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागीय तायक्वांदो (कराटे) स्पर्धेत समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, अरोली येथील विद्यार्थिनी निशा दिनेश मथुरे हिने उल्लेखनीय यश संपादन केले. १९ वर्षे वयोगटातील मुलींच्या तायक्वांदो स्पर्धेत निशा दिनेश मथुरे हिने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. या शानदार कामगिरीच्या जोरावर तिची आगामी राज्यस्तरीय तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिच्या या यशामुळे समर्थ रामदास हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. निशाने स्पर्धेदरम्यान आत्मविश्वास, जिद्द, चिकाटी आणि उत्कृष्ट क्रीडाकौशल्याचे दर्शन घडवत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. तिच्या या कामगिरीमुळे शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. नियमित सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबीयांचे प्रोत्साहन यामुळेच हे यश मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली.
निशा मथुरे हिच्या उल्लेखनीय यशाबद्दल शाळेचे संस्थाध्यक्ष शिवाजीराव कुंभलकर, संस्थासचिव मा. नंदाताई घटे, उपाध्यक्ष ॲड. अनिकेत कुंभलकर तसेच मुख्याध्यापक सुनील बडवाईक यांनी तिचा मेडल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी मान्यवरांनी निशाचे अभिनंदन करून आगामी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तिला मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या यशाबद्दल प्राचार्य सुनील बडवाईक, पर्यवेक्षक केशव डोकरीमारे तसेच क्रीडा शिक्षक सुधीर पोटभरे, नितीन उईके, संजय पुरी, विनेश फुलेकर, गणेश भलावीर, संजय बावणे, प्रवीण मोहनकर, प्रशांत मोटघरे, महेश लिचडे, नारायण वंजारी, अश्विन कुंभलकर, उषा कौरती, कविता आंबटकर, धनश्री उरकुडकर, प्रिती भुजाडे, भाग्यश्री श्रावणकर, पायल जांभुळकर, प्रियंका बावनगडे, प्रा. किरण धुर्वे, स्नेहा गभने, आरती कारेमोरे, पल्लवी सिंगाडे, आकांक्षा तांबूलकर, उषा मनगटे, जयश्री धुर्वे, लता मेश्राम, सुरेश रामटेके, मंगेश मोहनकर आणि पालकांनी निशा मथुरे हिचे अभिनंदन केले. निशाच्या या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करण्याची प्रेरणा मिळाली आहे. राज्यस्तरीय स्पर्धेतही निशाने आपल्या उत्कृष्ट खेळाची छाप पाडून शाळेचे व परिसराचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा शिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली आहे.

### महापौर निता ठाकरे अखिल भारतीय महापौर परिषदेच्या ११८ व्या कार्यकारिणी बैठकीत होणार सहभागी

#### महाराष्ट्र महापौर परिषदेच्या उपाध्यक्ष म्हणून नागपूरचे प्रतिनिधित्व करणार

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती निता ठाकरे या अखिल



भारतीय महापौर परिषदेच्या कार्यकारिणीच्या ११८ व्या बैठकीत सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र महापौर परिषदेच्या उपाध्यक्ष म्हणून त्या या बैठकीला उपस्थित राहून महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधित्व करणार आहेत. अखिल भारतीय महापौर परिषदेच्या कार्यकारिणीची ११८ वी बैठक सोमवार ५ व ६ ऑक्टोबर रोजी चंदीगड येथे आयोजित करण्यात आली आहे. चंदीगड महानगरपालिकेचे महापौर सौरभ जोशी यांच्या सौजन्याने या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील विविध महानगरपालिकांचे महापौर आणि परिषदेचे पदाधिकारी या बैठकीत सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र महापौर परिषदेच्या उपाध्यक्ष म्हणून महापौर निता ठाकरे यांचा या बैठकीतील सहभाग महत्त्वपूर्ण आहे. या सहभागाच्या माध्यमातून नागपूर शहराच्या नागरी विकासाचा अनुभव तसेच महानगरपालिकेच्या विविध उपक्रमांना राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठावर मांडण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

---

## वाडी उड्डाणपुलाला 'श्री संताजी जगनाडे महाराज' नाव देण्याची मागणी

### ओबीसींच्या स्वतंत्र जनगणनेसाठीही आमदार समीर मेघे यांना निवेदन

**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी**
नागपूर-अमरावती महामार्गावरील वाडी येथील उड्डाणपुलाला श्री संताजी जगनाडे महाराज उड्डाणपूलह्यअसे अधिकृत नाव देण्यात यावे, तसेच २०२६ च्या जनगणनेत ओबीसी समाजाची स्वतंत्र गणना करून ओबीसीसाठी स्वतंत्र कॉलम ठेवावा, अशी मागणी श्री संताजी अखिल तेली समाज संघटनेच्या वतीने करण्यात



आली.
याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी हिंगणा विधानसभा क्षेत्राचे आमदार समीर मेघे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. ओबीसी समाजाची अचूक लोकसंख्या व सामाजिक-आर्थिक स्थितीची आकडेवारी उपलब्ध झाल्यास शासनाला शिक्षण, रोजगार, आरक्षण व कल्याणकारी योजनांचे प्रभावी नियोजन करता येईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले. वाडी उड्डाणपुलाला संताजी जगनाडे महाराजांचे नाव देण्याची मागणीही शासनाकडे पाठपुरावा करून मंजूर करून घ्यावी, अशी विनंती करण्यात आली.
यावेळी पुरुषोत्तम लिचडे, कमलाकर पाटील, संजय जिवनकर, दीपक अवचट, अनिल बजाईत, ज्ञानेश्वर वंजारी, कान्होपात्रा रोडे, प्रकाश बिडवाईक, साधना घोडरे, संजय लांबट, अमोल कोहळे, अरुण कैकाडी यांच्यासह पदाधिकारी व समाजबांधव उपस्थित होते.

## बेबीबाई गोविंदाजी नवघरे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**
बेबीताई गौविंदाजी नवघरे राहणार माद्री, वय ७० वर्ष यांचे



वृद्धापकाळाने निधन झाले. त्या अविवाहित होत्या. त्यांना एक भाऊ असून बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांचेवर मांजरी घाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्ययात्रेला मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## महात्मा फुले शिक्षण संस्थेत महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर :** महात्मा फुले शिक्षण संस्था, रेशीमबाग, नागपूरद्वारे संचालित थोर महापुरुषांची जयंती व स्मृतिदिन समारोह समितीच्या वतीने २ ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि भारतरत्न, माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष गुलाबराव चीचाटे व सरचिटणीस रवींद्र अंबाडकर यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून दोन्ही महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाला संस्थेचे प्रकाश देवते, रमेश राऊत, प्रा.मुकेश घोळसे, संचालक तथा थोर महापुरुषांची जयंती व पुण्यस्मरण समारोह समितीचे संयोजक राजेंद्र पाटील, सहसंयोजक तथा संचालक प्रा. डॉ. अभिजीत पोतले, संचालक सुनील चिमोटे, शरद चांदोरे आणि देवेंद्र काटे यांची प्रमुख उपस्थिती होती.
याशिवाय अशोकराव अंजनकर, प्रा. प्रदीप दहिकर, शंकरराव चौधरी, आनंदराव बानाईत, प्रभाकरराव येवले, सिंधू कांडलकर, रंजना कडुकर, गंगाधरराव कडुकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारीवृंद आणि मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. महापुरुषांच्या जयंती आणि स्मृतिदिना निमित्त आयोजित अशा कार्यक्रमांमधून त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा आणि समाजात शिक्षण, समता, बंधुभाव व राष्ट्रप्रेमाची भावना दृढ करण्याचा प्रयत्न महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे कार्याध्यक्ष प्रकाश देवते, सहचिटणीस रमेश राऊत, प्रा. मुकेश घोळसे, संचालक तथा समारोह समितीचे संयोजक राजेंद्र पाटील, सहसंयोजक प्रा. डॉ. अभिजीत पोतले, संचालक सुनील चिमोटे, शरद चांदोरे, देवेंद्र काटे यांच्यासह अशोकराव अंजनकर, प्रा. प्रदीप दहिकर, शंकरराव चौधरी, आनंदराव बानाईत, प्रभाकरराव येवले, सिंधू कांडलकर, रंजना कडुकर, गंगाधरराव कडुकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाला समाजबांधव आणि संस्थेच्या कर्मचारी वृंदाची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. महापुरुषांच्या स्मृतींना अभिवादन करून त्यांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समितीच्या प्रयत्नांना यश, उड्डाणपुलाच्या पिलर्सवर साकारले अहिल्यादेवींचे भव्य चित्र

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची, विचारांची व प्रेरणादायी जीवनाची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचावी आणि त्यांच्या स्मृती नव्या पिढीसमोर जपल्या जाव्यात, या उद्देशाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समिती, नागपूर यांच्या वतीने करण्यात आलेल्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. नागपूर शहरातील डागा हॉस्पिटल चौक परिसरातील उड्डाणपुलाच्या पिलर्सवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे घोड्यावरील भव्य व आकर्षक पेंटिंग साकारण्यात आले आहे.
या चित्रामुळे उड्डाणपुलाच्या परिसराला ऐतिहासिक व सांस्कृतिक स्वरूप प्राप्त झाले असून, ये-जा करणाऱ्या नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे. यासंदर्भात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती




समितीच्या वतीने नॅशनल हायवेज अथॉरिटी ऑफ इंडिया, नागपूर यांच्याकडे पत्राद्वारे मागणी करण्यात आली होती. पत्रात नागपूर शहरातील इंदोरा चौक ते दिघोरी उड्डाणपुलाच्या बांधकामा दरम्यान पूर्ण झालेल्या भागातील पिलर्सवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे छायाचित्र / चित्र रेखाटण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली होती.
अहिल्यादेवींच्या जयंतीनिमित्त केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन विविध उपक्रम राबवत असल्याचा उल्लेखही या पत्रात करण्यात आला होता. या मागणीचा सकारात्मक विचार होऊन प्रत्यक्षात पिलर्सवर अहिल्यादेवी होळकर यांचे आकर्षक चित्र साकारण्यात आले. त्यामुळे स्मृती समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले आहे. या संपूर्ण कायार्साठी महादेवराव पातोंडे, विठ्ठलराव निघोट, डॉ. विनोद बरडे, श्यामभाऊ थोरात, ईश्वरजी मोरे, अनिल ताबंडे, शरद उरकुडे, रामजी सोनाग्रे, मधुकर काळमेघ आणि भालचंद्र महाजन यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि सामाजिक भावनेतून केलेल्या प्रयत्नांमुळे अहिल्यादेवींचे भव्य चित्र उड्डाणपुलाच्या पिलर्सवर साकारले गेले आहे. अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य, त्यांचे प्रशासन कौशल्य, समाजकल्याणाची दृष्टी आणि महिला सक्षमीकरणाचा विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी त्यांच्या जीवनकायार्चे दर्शन घडविणे आवश्यक आहे. या उपक्रमामुळे नागरिक व विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल, अशी भावना स्मृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.
या उपक्रमामुळे नागपूर शहराच्या सार्वजनिक परिसरात इतिहास, संस्कृती आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणारे एक सुंदर स्थळ निर्माण झाले असून, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कायार्ला ही एक आगळीवेगळी आदरांजली ठरली आहे.

---

# इतिहास विभागातर्फे म. गांधी व लाल बहादुर शास्त्री संयुक्त जयंती सोहळा संपन्न!

**दै. सिंहवाणी वृत्त, काटोल**
नबीरा महाविद्यालय काटोल येथील इतिहास विभागाद्वारे म. गांधी व लाल बहादूर शास्त्री संयुक्त जयंती सोहळा ऑडिओ-व्हिडिओ रूम येथे संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील कुमार नवीन तर गांधीजीच्या विषयावरील मुख्य वक्ते म्हणून डॉ. विलास फरकाडे सर व लालबहादूर शास्त्री या विषयावरील मुख्य वक्ते म्हणून डॉ. चंदू देशपांडे सर तथा मंचावर प्रमुख अतिथी म्हणून मानव्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.



सलामे, इतिहास विभाग प्रमुख प्रा. बेहनिया उपस्थित होते.
कार्यक्रमाची सुरुवात म. गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून व पूजन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा स्वागत समारंभाचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. त्यानंतर प्रास्ताविक पर मार्गदर्शन प्रा. दोडके सर यांनी जयंती सोहळा आयोजन महत्व व पाहुण्याचा परिचय करून देत कार्यक्रमाची रूपरेषा विषद केली.
त्यानंतर महात्मा गांधी या विषयावर मुख्य व्याख्याते डॉ. विलास फरकाडे सर यांनी गांधीजींचे बालपण, शिक्षण, साऊथ आफ्रिका येथील आंदोलन, गांधीजींचे भारतातील आगमन, भारतीय परिस्थितीचा आढावा व त्यानंतर असहकार चळवळ, कायदेभंग चळवळ व चले जाव आंदोलन यावर विस्तृत माहिती दिली. त्यानंतर लाल बहादूर शास्त्री या विषयावरील कार्यक्रमाला लाभलेले मुख्य व्याख्याते डॉ. चंदू देशपांडे यांनी लालबहादूर शास्त्री व गांधीजी यांच्यावरील जीवन परिचय देणारी कविता वाचन करून, लालबहादूर शास्त्री यांचे १९२० चे असहकार आंदोलन, १९३० चे सविनय कायदेभंग, १९४२ चलेजाव आंदोलन यातील सहभाग जीवनातील ९ वर्ष तुरुंगवास, पंतप्रधान कारकीर्द, हरित व श्वेत क्रांती व १९६५ चे भारत पाकिस्तान युद्ध 'जय जवान - जय किसान' याचे महत्त्व आणि ताश्कंद करार व गुड रहस्यमय मृत्यू यावर विस्तृत माहिती दिली. तर अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. व आपल्या महाविद्यालयातील इतिहास विभाग येथील मेरिट परंपरा व इतिहास विभागातील विद्यार्थी व त्यातूनच बनलेले सध्याचे प्राध्यापक यांची स्तुती करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन इतिहास विभागातील प्रा. भाग्यश्री घुरडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. शिशिर कळंबे यांनी केले. या संयुक्त जयंती सोहळ्यासाठी मानव्यशास्त्र व विज्ञान विभागातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला बी. ए. व एम. ए. विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी एकूण ७७ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इतिहास विभागाने मोलाची कामगिरी बजावली.

Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
दैनिक सिंहवाणी वृत्त
Epaper : epaper.sinhvani.com
दिनांक : रविवार, ४ ऑक्टोबर २०२६

थोडक्यात

## पीक विमाधारक शेतकऱ्यांच्या नुकसानीची तातडीने पाहणी करून पंचनामे करा!

### कीड, रोगराई व नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान; कृषी विभाग व विमा कंपनीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वस्तुनिष्ठ पाहणी करण्याची मागणी



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**
तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा पीक विमा काढलेला आहे, त्यांच्या पिकांचे सध्या विविध कारणांमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक ठिकाणी पिकांवर कीड व रोगराईचा प्रादुर्भाव झाला असून, काही भागात प्रतिकूल हवामान व इतर नैसर्गिक कारणांमुळे पिकांना फटका बसला आहे. पीक विमा योजनेअंतर्गत विमा काढलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या नुकसानीची योग्य ती भरपाई मिळणे आवश्यक आहे. मात्र, त्यासाठी संबंधित कृषी अधिकारी तसेच विमा कंपनीच्या प्रतिनिधींनी केवळ कार्यालयीन पातळीवर प्रक्रिया न करता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पिकांची पाहणी करणे गरजेचे आहे.
नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतात प्रत्यक्ष पाहणी करून पिकांची सद्यस्थिती, नुकसानीचे प्रमाण व नुकसान होण्याची कारणे यांची वस्तुनिष्ठ व पारदर्शक पद्धतीने नोंद करण्यात यावी. तसेच पाहणीअंती नियमानुसार पंचनामा करून पीक विमा दाव्याची आवश्यक प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात यावी, अशी शेतकऱ्यांकडून मागणी होत आहे. शेतकऱ्यांनीही आपल्या पिकांचे नुकसान झाल्यास विलंब न करता संबंधित कृषी अधिकारी व पीक विमा कंपनीशी संपर्क साधून नुकसानीची माहिती द्यावी. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विमा योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागू नये, यासाठी प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची गरज आहे. सालेकसा हा ग्रामीण व कृषिप्रधान तालुका असून, येथील अनेक शेतकरी शेतीवरच आपली उपजीविका अवलंबून ठेवतात. त्यामुळे पिकांचे नुकसान झाल्यानंतर त्यांना मिळणारी विमा भरपाई ही केवळ आर्थिक मदत नसून पुढील हंगामासाठी मोठा आधार ठरू शकते. शासन व संबंधित विभागाने या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतांची तातडीने पाहणी करावी, पंचनामे व विमा दाव्याची प्रक्रिया पारदर्शकपणे पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

## १५० हून अधिक दुकानदार व ग्राहकांना १ हजार ५०० कापडी पिशव्यांचे वाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत शुक्रवारी (ता. २) रोजी नागपूर महानगरपालिकेच्या झोन क्र. ०२, प्रभाग क्र. १५ अंतर्गत गोकुळपेठ मार्केट येथे सिंगल-यूज प्लास्टिकचा वापर टाळण्याबाबत जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानामध्ये मनपाचे उपायुक्त राजेश भगत, सहायक आयुक्त राजकुमार मेश्राम,मुख्य स्वच्छता अधिकारी गजेंद्र महल्ले, विभागीय अधिकारी लोकेश बासनवार, उपद्रव शोध पथक, तेजस्विनी महिला मंचच्या अध्यक्षा किरण मुंधडा, रोटरी क्लब ऑफ वायसीसीई महाविद्यालयाचे सदस्य तसेच पीयूआय टीमचे सदस्य सहभागी झाले. अभियानादरम्यान गोकुळपेठ मार्केटमधील दुकानदार आणि ग्राहकांशी संवाद साधून सिंगल-यूज प्लास्टिकचा वापर टाळण्याचे तसेच त्याऐवजी पर्यावरणपूरक कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. जनजागृतीचा संदेश नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने १५० हून अधिक दुकानदार व ग्राहकांना १,५०० कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.
प्लास्टिकमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान, सार्वजनिक ठिकाणी निर्माण होणारा कचरा आणि स्वच्छतेसमोरील आव्हाने याबाबत नागरिकांना माहिती देण्यात आली. दैनंदिन जीवनात प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर कमी करून पुनर्वापर करता येणाऱ्या कापडी पिशव्यांचा स्वीकार करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. प्लास्टिकला नकार - कापडी पिशवीचा स्वीकार! आणि स्वच्छ बाजारपेठ - निरोगी पर्यावरण! या संदेशातून स्वच्छता व पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्याचा संदेश देण्यात आला.

## गांधी, शास्त्री जयंती उत्साहात साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
पारवे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पारवे कॉलेज ऑफ नर्सिंग आणि पारवे पॅरामेडिकल इन्स्टिट्यूशन यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पारवे कॉलेज ऑफ नर्सिंग येथे झालेल्या कार्यक्रमाच्या प्रारंभी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गांधीजींचे सत्य, अहिंसा व स्वच्छतेचे विचार तसेच शास्त्रीजींची साधी राहणी, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि देशभक्ती या गुणांवर प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमास पारवे कॉलेज ऑफ नर्सिंगच्या मॅनेजमेंट मेंबर दीपिका पारवे, संचालक डॉ. मिश्रा, प्राचार्या चारुलता गुलघाने, शिक्षिका वैशाली राऊत, ईशिका फुलझेले यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन तेजल वानकर यांनी केले. माही बडिये यांनी आभार मानले. गांधीजी व शास्त्रीजी यांच्या विचारांचा दैनंदिन जीवनात अंगीकार करून सत्य, शिस्त, स्वच्छता, प्रामाणिकपणा आणि देशसेवेची भावना जोपासण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# मजबूत पायाभूत सुविधांवर विकासाची पायाभरणी

### नितीन गडकरी यांचे प्रतिपादन, इंडियन काँक्रीट इन्स्टिट्यूटतर्फे आंतरराष्ट्रीय परिषद



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
चांगल्या पायाभूत सुविधांशिवाय गुंतवणूक येत नाही, गुंतवणूकिशिवाय रोजगार निर्माण होत नाही आणि रोजगाराशिवाय गरिबी दूर होत नाही. त्यामुळेच पायाभूत सुविधांना खूप महत्त्व आहे. विकासाची पायाभरणी ही मजबूत पायाभूत सुविधांवर आधारित आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रीनितीन गडकरी यांनी केले.
इंडियन काँक्रीट इन्स्टिट्यूट तर्फे नागपूर येथे आयोजित 'Asian Scenario on Infrastructural Development' या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. या कार्यक्रमाला आयसीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. व्ही. रामचंद्रा, सिडनी येथील इंटरनॅशनल फेडरेशन फॉर स्ट्रक्चरल कॉंक्रिट (एफआयबी)चे स्टिफन फोस्टे, आयसीआयचे नियोजित अध्यक्ष मनोज कावलकर, महासचिव राधाकृष्णन यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.
नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने आशियातील पायाभूत सुविधांच्या भविष्यावर चर्चा करण्यासाठी उपयुक्त स्थान असल्याचे त्यांनी नमूद केले. तंत्रज्ञान हा विकासाचा आधार असून नावीन्यता ही आत्मनिर्भर भारताची ताकद आहे, असे सांगत नितीन गडकरी यांनी शाश्वत, मजबूत आणि परवडणारे इन्फ्रास्ट्रक्चर उभारण्याचे आवाहन केले.
ते म्हणाले, भारत हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा सिमेंट उत्पादक देश असून येत्या काळात आशियातील पायाभूत सुविधांची मागणी काँक्रीटवर आधारित असेल. फ्लाय अँश, स्लॅग आणि रिसायकल्ड अँग्रीगेट्सच्या माध्यमातून 'ग्रीन काँक्रीट' तयार करून 'कचऱ्यातून समृद्धी' निर्माण केली जात आहे. प्रीकास्ट काँक्रीट आणि जीएफआरपी तंत्रज्ञानामुळे बांधकामाचा वेग वाढो. नागपूर येथील इंदोरा चौक ते दिघोरी चौक दरम्यान उभारण्यात आलेला ९ किमी लांबीच्या उड्डाणपुलासाठी व ltra high performance reinforcement concrete (UHPFRC) तंत्रज्ञान वापरले आहे. यामुळे प्रवासाचा वेळ ५० मिनिटांवरून अवघ्या १० मिनिटांवर आला असून पूर्व व उत्तर नागपूर दरम्यान सिग्नल-मुक्त संपर्क प्रस्थापित झाला आहे.'

## वाडीत सेवा संकल्प अभियान, भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन




**दै. सिंहवाणी वृत्त, वाडी :** आपल्या हस्त कलेच्या माध्यमातून स्वच्छ, सुंदर आणि हरित वाडी शहर समृद्धतेचा संदेश देण्यासाठी काली माता मंदिर येथे सेवा संकल्प अभियान अंतर्गत भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांमध्ये स्वच्छता, पर्यावरण संवर्धन व सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे व शहरातील हौशी व्यक्तीच्या कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते गुरुदास बावणे यांनी दिली आहे. रविवार दि.४ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वा.पासून काली माता मंदिर परिसरात इच्छुक सर्व स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभागी होऊन आकर्षक बक्षिसे मिळवण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## कहाली-पानगाव रस्त्याची दुरुस्ती अजूनही प्रतीक्षेत; २०१९ पासून 'निधी मिळताच काम सुरू'चे आश्वासन



**दै. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा**
तालुक्यातील कहाली ते पानगाव या महत्त्वाच्या रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. सन २०१९ मध्ये माहितीच्या अधिकारातून या रस्त्याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपविभाग, आमगाव कार्यालयाकडून देण्यात आलेल्या लेखी उत्तरात कहाली ते पानगाव रस्ता रस्ते विकास आराखड्यात समाविष्ट असल्याचे, तसेच जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत (३०५४ ग्रामीण मार्ग) रस्ते दुरुस्तीच्या आराखड्यातही समावेश असल्याचे नमूद करण्यात आले होते.मात्र, रस्ते दुरुस्तीसाठी उपलब्ध निधीनुसार हा रस्ता प्राधान्याने दुरुस्तीसाठी प्रस्तावित करण्यात येईल, असेही २०१९ च्या उत्तरात स्पष्ट करण्यात आले होते. त्यानंतरही अनेक वर्षे उलटून गेली असताना प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नसल्याने नागरिकांमध्ये प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**आराखड्यात समावेश असतानाही प्रत्यक्ष काम कधी?**
कहाली-पानगाव मागार्चा आराखड्यात समावेश असल्याचे शासकीय उत्तरातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम नेमके कोणत्या टप्प्यावर आहे, किती निधी मंजूर झाला आहे, निधी उपलब्ध झाला आहे का आणि प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार, याबाबत पुन्हा एकदा माहितीच्या अधिकारातून सविस्तर माहिती मागविण्यात येणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना रस्त्याच्या दुरवस्थेमुळे अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित विभागाने केवळ आराखडे व आश्वासने न देता प्रत्यक्ष रस्ते दुरुस्तीचे काम कधी सुरू होणार, याबाबत स्पष्ट माहिती द्यावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. २०१९ मध्ये विचारलेला प्रश्न आजही कायम असून, आता नव्याने आरटीआयच्या माध्यमातून या रस्त्याच्या कामाची सद्यस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## गावाच्या विकासासाठी देवग्रामवासी एकवटले

### गांधी जयंतीनिमित्त ग्रामस्वच्छता, वृक्षारोपणातून एकतेचा संदेश, डॉ. भाऊसाहेब भोगे यांचा पुढाकार





**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील देवग्राम येथे गांधी जयंतीनिमित्त ग्रामस्वच्छता व वृक्षारोपण उपक्रम राबवून गावकऱ्यांनी एकजुटीचा आणि ग्रामविकासाचा संदेश दिला. गावाच्या स्वच्छ, सुंदर आणि हरित विकासासाठी नागरिकांनी एकत्र येत प्रत्यक्ष कृतीतून आपली सामाजिक बांधिलकी जपली.
गावाच्या विकासासाठी सातत्याने पुढाकार घेणारे डॉ. भाऊसाहेब भोगे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. त्यांनी स्वतःच्या खर्चातून वृक्षारोपणासाठी विविध प्रकारची रोपे उपलब्ध करून दिली. गावातील सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या कडेला तसेच मोकळ्या जागांवर वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी गावकऱ्यांनी परिसराची स्वच्छता करून स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम न राहता ती नियमितपणे सुरू ठेवण्याचा संकल्प केला.
महात्मा गांधी यांनी स्वच्छतेला समाजाच्या प्रगतीशी जोडले होते. त्यामुळे गांधी जयंतीनिमित्त केवळ कार्यक्रम न घेता स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामविकासाच्या माध्यमातून गांधीजींचे विचार प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा प्रयत्न देवग्राम येथे करण्यात आला. डॉ. भाऊसाहेब भोगे यांच्या पुढाकारामुळे गावाच्या सौंदर्यात भर पडत असून, ग्रामविकासासाठी त्यांची दूरदृष्टी आणि सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद असल्याचे युवकांनी सांगितले. गावासाठी चांगला विचार करून तो प्रत्यक्ष कृतीत आणणे, हाच गांधीजींच्या विचारांचा खरा सन्मान असल्याचेही युवकांनी व्यक्त केले.
या उपक्रमात देवग्राम येथील नागरिकांसह जीवन विकास महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले. गावाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम केल्यास देवग्रामला स्वच्छ, सुंदर, हरित आणि आदर्श गाव बनविता येईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

**स्वखर्चातून रोपे उपलब्ध**
गांधी जयंतीनिमित्त देवग्राम येथे ग्रामस्वच्छता व वृक्षारोपण करण्यात आले. विशेष म्हणजे डॉ. भाऊसाहेब भोगे यांनी स्वखचार्तून वृक्ष उपलब्ध करून दिले. गावाच्या विकासासाठी त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे गावाच्या विकासाला चालना मिळत असल्याचे नागरिकांनी सांगितले.
**– महेंद्र वासाडे, नागरिक, देवग्राम**

# टेकडी गणेश मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त नऊ दिवस अखंड मनोकामना ज्योतींचे आयोजन

### भक्तांच्या नावाने १०८ अखंड ज्योती प्रज्वलित होणार; प्रत्येकी १,५०१ रुपये शुल्क भरून नावनोंदणी करण्याचे संस्थेचे आवाहन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूरचे ग्रामदैवत आणि अतिप्राचीन व प्रसिद्ध असलेल्या श्री गणेश मंदिर, टेकडी येथे अश्विन नवरात्रोत्सवानिमित्त यंदाही भक्तांसाठी नऊ दिवस अखंड मनोकामना ज्योती प्रज्वलित करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या पावन पर्वावर भाविकांना आपल्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी श्रद्धेने ज्योत प्रज्वलित करण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मंदिर संस्थेने हा उपक्रम हाती घेतला आहे.
श्री गणेश मंदिर टेकडी येथे दरवर्षी अश्विन नवरात्रोत्सवात १०८ अखंड मनोकामना ज्योती प्रज्वलित करण्याची परंपरा आहे. या धार्मिक उपक्रमाला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, अनेक भक्तांकडून स्वतःच्या नावाने ज्योत प्रज्वलित करण्याची मागणी करण्यात येत होती. भक्तांच्या या आग्रहाचा आणि श्रद्धेचा विचार करून मंदिर संस्थेने मागील वषार्पासून १०८ अखंड मनोकामना ज्योती भक्तांच्या नावाने प्रज्वलित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार यंदाही हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.
या उपक्रमात सहभागी होऊ



इच्छिणाऱ्या भाविकांना प्रत्येकी १,५०१ रुपये शुल्क भरून आपली नावनोंदणी करता येणार आहे. नावनोंदणी केल्यानंतर संस्थेकडून अधिकृत पावती घेणे आवश्यक आहे. रविवार, ११ ऑक्टोबर रोजी दुपारी १ वाजता मंदिर परिसरात विधिवत पूजा-अर्चा करून अखंड मनोकामना ज्योती प्रज्वलित करण्यात येणार आहेत. या वेळी संबंधित भाविकांनी आपली पावती सोबत आणून ज्योत प्रज्वलित करण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन मंदिर संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.
नवरात्रोत्सव हा शक्ती, भक्ती आणि उपासनेचा उत्सव मानला जातो. या काळात देवीच्या आराधनेसह अखंड ज्योत प्रज्वलित करण्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे. नऊ दिवस तेवत राहणाऱ्या या ज्योती भक्तांच्या श्रद्धेचे आणि भक्तिभावाचे प्रतीक मानल्या जातात. त्यामुळे टेकडी गणेश मंदिरातील या उपक्रमातून भाविकांना धार्मिक परंपरेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. या धार्मिक उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री गणेश मंदिर संस्थेचे कार्यकारी मंडळ प्रयत्नशील आहे.
मंदिराचे अध्यक्ष श्रीराम बी. कुळकर्णी, उपाध्यक्ष अरुण व्यास, सचिव दिलीप एम. शहाकार, सहसचिव सुनील एस. अग्निहोत्री, कोषाध्यक्ष हरी लक्ष्मण भालेराव, विश्वस्त अरुण डी. कुळकर्णी, विकास ए. लिमये, अँड. शांतीकुमार शर्मा, शरद एन. वैद्य, कमलसिंग चोप्रा आणि वासुदेव गंगवाणी यांनी भाविकांना या धार्मिक उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. टेकडी गणेश मंदिरातील अखंड मनोकामना ज्योतींच्या या उपक्रमामुळे नवरात्रोत्सवाच्या भक्तिमय वातावरणात आणखी भर पडणार असून, भाविकांकडून या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा मंदिर संस्थेने व्यक्त केली आहे.

थोडक्यात

## सेवा संकल्प अभियाना अंतर्गत पाली येथे बंधारा बांधुन महात्मा गांधी जयंती साजरी



**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**

गांधी जयंती निमित्त ग्राम पाली येथे ना दे कृ सं प्र ट २ , सेवा संकल्प अभियाना अंतर्गत वनराई बंधाऱ्याचे काम करण्यात आले. तसेच पोक्रा अंतर्गत लाभ घेतलेल्या शेतकऱ्याकडे दीप प्रज्वलन करून शेतकऱ्याचे मनोबल वाढविण्यात आले त्यांच्या जीवनात यश, उमंग व आशेची किरण त्या ज्योतीतून निर्माण झाली. यावेळी उपविभागीय कृषी अधिकारी कु ग्रीष्मा देहाने, तालुका कृषी अधिकारी राकेश वसु, मंडळ कृषी अधिकारी शिरपूरकर, मंडळ कृषी अधिकारी अली, साठकर, सहाय्यक कृषी अधिकारी अमित झोड, तंत्रज्ञान समन्वयक वालदे, समूह सहाय्यक तनुश्री खोब्रागडे सरपंच शुभम राऊत , ग्रामपंचायत अधिकारी जगदीश राऊत,शेतकरी मनोज प्रधान, भूपेंद्र खोब्रागडे, धर्मराज राऊत, विशाल डोणारकर, अमन राऊत, महेश प्रधान, महेश डोनारकर, ओमनाथ डोनारकर, प्रमोद सोनवणे, पवन राऊत , सचिन प्रधान, सुमित केवट, महिला शेतकरी रुपाली प्रधान, मंगला राऊत, उषा राऊत, नागबाई भागडकर, साधना राऊत, कृषीताई अल्का प्रधान समेट सह मोठ्या संख्येने गणमान्य नागरीक उपस्थित होते.

## उमरेड तालुक्यात दुष्काळाची झळ, सुधीर पारवेंनी बांधावर जाऊन पाहिली पिकांची अवस्था

### पिकांची पाहणी नको, सरसकट नुकसानभरपाई द्या!



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

सततची नापिकी, पावसातील खंड आणि प्रतिकूल हवामानामुळे उमरेड तालुक्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक शेताच्या नुकसानीची पाहणी करण्याच्या किचकट प्रक्रियेत शेतकऱ्यांना अडकविण्याऐवजी पीक पेऱ्यानुसार सरसकट नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी माजी आमदार सुधीर पारवे यांनी केली. पारवे यांनी २ ऑक्टोबर रोजी देवळी, आमगाव, मुरझडी, तांबेखनी, भिवगड, खैरी, जांभळापाणी आणि वेलसाखरा या गावांचा दौरा करून थेट शेताच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी केली. सोयाबीन, धान, कापूस, संत्रा, पपई, भाजीपाला तसेच जिरायती व बागायती पिकांच्या नुकसानीची त्यांनी पाहणी केली.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदतीसाठी पुन्हा कागदोपत्री पंचनामे, पाहण्या आणि प्रतीक्षेच्या फेऱ्यात न अडकविता सरसकट मदत द्यावी, अशी भूमिका पारवे यांनी मांडली. याबाबत त्यांनी उपविभागीय अधिकारी विद्यासागर चव्हाण यांच्याशी शेताच्या बांधावरूनच भ्रमणध्वनीवर संपर्क साधून शेतकऱ्यांना पीक नुकसानभरपाई देण्याची मागणी केली. उमरेड तालुक्यातील शेतकरी सातत्याच्या नापिकीमुळे आधीच हवालदिल झाला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने दुष्काळग्रस्त परिस्थितीची दखल घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या दौऱ्यात भाजप उमरेड ग्रामीणचे अध्यक्ष मनोज दांदडे, कृउबास संचालक संदीप हुलके यांच्यासह विविध पदाधिकारी, ग्रामस्थ आणि संबंधित गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गांधी जयंतीनिमित्त चाचेर शाळेत स्वच्छता अभियान व विविध उपक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा**

पी.एम.श्री. जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चाचेर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गांधीजींच्या विचारांवर तसेच स्वच्छतेचे महत्त्व यावर मनोगत व्यक्त केले. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश देत शाळा व परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प केला. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. शिक्षकांनी महात्मा गांधींचे सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि शिस्तीचे विचार विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन सहारे, उपाध्यक्ष शुभांगी आंबीलडुके, मुख्याध्यापक अनिल गडपायले, शिक्षकवृंद रविंद्र घुगे, परविन शेख, भारती साखरकर,प्रीती खंगार, संगीता बालकोटे, उकुड्डे, रुचीला खंडाईत व नेहा निमजे यांचा सक्रिय सहभाग व मार्गदर्शन लाभले.

## पाटणसावंगी येथे वृद्धाचा रोडवर पडल्याने मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर** : आज सकाळी १० च्या सुमारास शेताकडे पायी जाणाऱ्या वृद्ध शेतकऱ्याचा रोडवर पडल्याने डोक्याला जबर मार लागुन उपचारादरम्यान मृत्यू झाला. दादाराव सातपुते वय ७०



रा. वाकीपुरा, पाटणसावंगी ता.सावनेर असे वृद्ध शेतकऱ्याचे नाव आहे. नेहमी प्रमाणे आजही वाकीकडे जाणाऱ्या रोडने पायदळ शेताकडे निघालेल्या शेतकरी दादाराव सातपुते यांना सकाळी १० च्या सुमारास अचानक भोवळ आली व ते रोडवर पडल्या गेले. रोडवर अचानक पडल्याने त्यांच्या डोक्याला जबर मार लागला. रोडवर पडले दिसल्याने त्यांना रोडवर जाणाऱ्या तरुणांनी येथील ग्रामीण रुग्णालयात नेले असता त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना मेडिकल कॉलेज नागपूर येथे नेण्यात आले येथील उपचारानंतर आज दुपारी त्यांचा मृत्यू झाला.

# खोलदोडा जंगलात सागवान चोरीप्रकरणी मोठी कारवाई

## दोन ट्रॅक्टरमधील सागवान जप्त, दहा मजूर ताब्यात, मुख्य आरोपीचा शोध सुरू



**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर** तालुक्यातील मौजा खोलदोडा येथील कक्ष क्रमांक ३४७ आरएफमध्ये सागवानाची अवैध वृक्षतोड करून लाकूड चोरी केल्याप्रकरणी महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या दक्षिण उमरेड वन परिक्षेत्राने शनिवारी मोठी कारवाई केली. गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या कारवाईत सागवान लाकडाने भरलेले दोन ट्रॅक्टर आणि दहा मजूर आढळून आले. वन विभागाच्या पथकाने कारवाई करत सागवान लाकूड व दोन्ही ट्रॅक्टर ताब्यात घेतले. प्रकरणातील दहा जणांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्याकडून वनक्षेत्रातील वृक्षतोडीबाबत माहिती घेतली जात आहे. या प्रकरणामागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच यापूर्वी अशाच प्रकारच्या चोरीच्या घटना घडल्या आहेत का, याचा तपास वन विभागाकडून केला जाणार आहे. सहाय्यक व्यवस्थापक तथा एसीएफ प्रवीण खानंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि विभागीय व्यवस्थापक अजिंक्य घाटेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.

दरम्यान, ताब्यात घेतलेल्या आरोपींना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रकरणातील मुख्य आरोपी तसेच यापूर्वी घडलेल्या अशा चोरीच्या घटनांबाबत महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता आहे. तपासादरम्यान आरोपींची संख्या वाढू शकते. तसेच आरोपींची वन कोठडी मागण्यात येणार असल्याचे एसीएफ प्रवीण खानंदे यांनी सांगितले.

वनक्षेत्रातील अवैध वृक्षतोड आणि सागवानाच्या अनधिकृत वाहतुकीविरोधात वन विभागाकडून कारवाई सुरू असून, या प्रकरणाच्या पुढील तपासाकडे लक्ष लागले आहे.

## महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**



आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन, वरोरा येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती तसेच भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न,लाल बहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. गोपाल वरूटकर होते. प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. सुरेश राठोड, प्रा. नीरज आत्राम, कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन, दीप प्रज्वलन व अभिवादन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुरेश राठोड यांनी केले. आपल्या प्रास्ताविकातून त्यांनी महात्मा गांधी यांच्या सत्य, अहिंसा, स्वच्छता आणि साधेपणाच्या विचारांचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच लालबहादूर शास्त्री यांचा प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, देशभक्ती आणि साध्या जीवनशैलीचा आदर्श विद्यार्थ्यांनी आत्मसात करावा, असे आवाहन केले.

यावेळी प्रा. डॉ. गोपाल वरूटकर यांनी अध्यक्षीय भाषणातून महात्मा गांधींच्या सत्याग्रह, अहिंसा आणि सामाजिक समतेच्या विचारांचा आजच्या समाजजीवनाशी असलेला संबंध स्पष्ट केला. गांधीजींचे विचार केवळ स्मरणापुरते मर्यादित न ठेवता ते आचरणात आणणे हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे त्यांनी सांगितले. लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, स्वाभिमान, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श विद्यार्थ्यांनी घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

प्रा. नीरज आत्राम यांनी आपल्या मनोगतात महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करून त्यांच्या मूल्यांचा दैनंदिन जीवनात अंगीकार करावा, असे आवाहन केले. स्वच्छता, शिस्त, श्रमप्रतिष्ठा, देशप्रेम आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांमधून राष्ट्रनिर्मितीत युवकांची महत्त्वाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन कु. स्वरांजली चौधरी हिने केले, तर कु. सायली बलकी हिने उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम प्राचार्य, डॉ. मृणाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.

कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेवक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर सर्व स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील परिसर स्वच्छ केला या श्रमदानातून दोन्ही महापुरुषांना खरी श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## स्व. मोहन मंगल सांगोडे नगर परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांची बँक भेट

### प्रत्यक्ष व्यवहारातून घेतले बँकिंगचे धडे, ५६ विद्यार्थ्यांचा सहभाग



**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक व बँकिंगविषयक साक्षरता वाढावी, या उद्देशाने स्व. मोहन मंगल सांगोडे नगर परिषद रामटेक शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया, रामटेक शाखेला शैक्षणिक भेट दिली. इयत्ता ५ वी ते ७ वीतील ५६ विद्यार्थ्यांनी या भेटीत सहभाग घेतला. मुख्याध्यापक प्रशांत हूड व सहाय्यक शिक्षिका सोनाली भगत यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या भेटीत विद्यार्थ्यांना बँकेत खाते उघडणे, पैसे जमा व काढण्याची प्रक्रिया, एटीएम, पासबुक प्रिंटिंग मशीन तसेच डिजिटल बँकिंगची माहिती देण्यात आली. बँक अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देत त्यांना प्रत्यक्ष व्यवहारांचे मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात व आत्मविश्वासात भर पडली. उपक्रमाचे पालक व शिक्षण क्षेत्रातून कौतुक होत आहे.

## दहेगाव येथे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा व पालक सभा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहूः मौदा**



पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दहेगाव येथे महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या निमित्त शाळेत विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पधेर्चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी महात्मा गांधीजींच्या सत्य, अहिंसा व स्वच्छतेच्या विचारांवर तसेच लाल बहादूर शास्त्री यांच्या 'जय जवान, जय किसान' या विचारांवर प्रभावी भाषणे केली. शिक्षकांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवन कार्यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमानिमित्य विद्यार्थीसाठी वक्तृत्वस्पर्धा घेण्यात आली त्यात प्रथम क्रमांक स्वरा विजय हटवार, द्वितीय क्रमांक नव्या तलमले व आर्या आंबीलढुके,तृतीय क्रमांक आराध्या देशमुख व गुंजन आंबिलढुके या विद्यार्थिनींचा आला. या विद्यार्थीनींना बक्षिस देण्यात आले. त्यानंतर शाळेत पालक सभेचे आयोजन करण्यात आले. पालक सभेत विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, शाळेतील उपक्रम व गुणवत्तावाढीवर चर्चा करण्यात आली. पालकांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितेश इंगळे, सरपंच भारती संदीप आंबीलढुके, उपसरपंच रविंद्र ढोमणे, माजी उपसरपंच संदिप आंबीलढुके,केंद्रप्रमुख राजू आंबीलकर व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक वासुदेव भुते यांच्या नेतृत्वात सर्व शिक्षकवृंदाने केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकवृंद राजेश रोहाड, सुधीर खंडाईत, सुधीर कांबळे, सुजाता बोधले, प्रज्ञा रामटेके, संगीता आंबीलढुके,ज्योती आंबीलढुके, पुष्पलता उके, उमेश उके यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वरोऱ्यातील जबरी चोरीचा २४ तासात छडा, १९ वर्षीय आरोपी अटकेत

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा -धर्मेंद्र शेरकुरे**

घरात घुसून तरुणीला बेडरूम मध्ये डांबून मारहाण करून घरातील पाच हजार रुपयांची रोकड लंपास केल्याच्या जबरी चोरीचा वरोरा पोलिसांनी अवघ्या २४ तासात छडा लावला आरोपी प्रज्वल प्रमोद झिले वय १९ वर्ष राहणार टेमुर्डा तालुका वरोरा याला याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. ३० सप्टेंबर रोजी दुपारी महाविद्यालयातून घरी परतलेल्या तरूणीला घरात तोंडाला दुपट्टा बांधलेला अनोळखी व्यक्ती दिसला तिने आरडाओरड केल्याने आरोपीने तिला हाताने ओढुन बेडरूममध्ये ढकलले आणि बाहेरून दरवाजा बंद केला व पलायण केले.

यामध्ये तरुणीच्या हाताला दुखापत झाली. काही वेळानंतर आई वडील घरी परतल्यानंतर दरवाजा उघडून पाहता क्षणी त्यांना धक्का बसला दरवाजा उघडून तरुणींची सुटका केली. आलमारी तपासली असता पाच हजारांची रोकड गायब असल्याचे आढळले. आरोपीला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई चंद्रपूर जिल्हा पोलीस अधीक्षक आयुष्य नोपानी , अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष बाकल यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक ओमप्रकाश सोनटक्के हे तपास करीत आहे.

## लोकसहभागाची ताकद! दारूच्या बॉटल्या फेकणाऱ्या टवाळखोरांना चाप, गरंडा जि. प. शाळेत ग्रामस्थांनी बसवले सीसीटीव्ही कॅमेरे

**दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी**



एकिकडे गावकरी, शिक्षक आणि पालकांच्या लोकसहभागातून गरंडा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा कायापालट आणि शैक्षणिक विकास सुरू असताना, दुसरीकडे मात्र अवैध दारू विक्री आणि टवाळखोरांच्या त्रासाने डोकेदुखी वाढवली होती. रात्रीच्या वेळी टवाळखोर थेट शाळेसमोरील रस्त्यावर दारू पिऊन रिकाम्या बॉटल्स शालेय परिसरात फेकून देत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, ग्रामस्थांनी हार न मानता पुन्हा एकदा लोकसहभागाची ताकद दाखवून देत संपूर्ण शाळा परिसर उउळश कॅमेऱ्यांच्या छत्राखाली आणला आहे.

**काय आहे नेमकी घटना ?**

गेल्या काही दिवसांपासून गावात अवैध दारू विक्रीचे प्रमाण वाढले होते. काही समाजकंटक व टवाळखोर रात्रीच्या वेळी शाळेसमोरील रस्त्यावर दारू पिऊन रिकाम्या बॉटल्स पटांगणात फेकून देत असत. सकाळी लहान मुले शाळेत आल्यावर त्यांना दारूच्या फुटलेल्या बॉटल्स दिसून येत असे. यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न उभा राहिला होता.

या त्रासाला कंटाळून या टवाळखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक व ग्रामस्थांनी तातडीने बैठक घेतली. पोलिसांकडे तक्रार करण्यासोबतच कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून शाळा परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या देखरेखीखाली आणण्याचा निर्णय घेण्यात आला. ग्रामस्थ, माजी विद्यार्थी आणि दानशूर व्यक्तींनी पुढाकार घेत या उपक्रमासाठी निधी गोळा केला. यामध्ये मे. एस. आर. इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक राहुल मिश्रा, सरपंच सोनाली धोटे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप मेश्राम, ग्राम पंचायत अधिकारी धीरज सहारे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष आनंद चव्हाण, उपाध्यक्ष प्रवीण धोटे, मुख्याध्यापक खुशाल कापसे, सहाय्यक शिक्षक ओंकार पाटील, आशा वर्कर सिंधू धोटे, सीआरपी सपना कोहळे, अंगणवाडी सेविका संघमित्रा शेंडे, मदतनीस चंद्रकला गजभिये यांनी पुढाकार घेत निधी गोळा करून

> शाळेचे पावित्र्य भंग करण्याचे काम काही टवाळखोर आणि विध्वंसक प्रवृत्तीच्या लोकांनी केले होते. परंतु आमची शाळा ही आमच्या गावाचे भूषण असल्यामुळे आम्ही ग्रामस्थांनी तातडीने निधी उभारून कॅमेरे बसविले. यामुळे आता टवाळखोरांवर पूर्णपणे वचक तर बसेलच त्यासोबतच आमची मुलेसुद्धा सुरक्षित होतील.
>
> **– संदीप मेश्राम,**
> **अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती गरंडा**

शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारासह, समोरील रस्ता, पटांगण, जिजाऊ शिवराई स्मृती परिसर, बळीराजा परसबाग आणि मागील बाजूस अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

आता शाळेच्या मुख्य कक्षातून व मुख्याध्यापकांच्या मोबाईलवरून २४ तास या परिसरावर लक्ष ठेवले जात आहे. सीसीटीव्ही बसवल्यामुळे टवाळखोरांचे धाबे दणाणले असून परिसरातील अवैध प्रकारांना पूर्णपणे आळा बसेल असा विश्वास पालकांमध्ये निर्माण झाला आहे. ग्रामस्थांच्या या सतर्कतेचे आणि एकजुटीचे गट विकास अधिकारी सुभाष जाधव, शिक्षण विस्तार अधिकारी सुनील कोडापे, केंद्र समन्वयक विजय राठोड यांनी कौतुक केले.

थोडक्यात

## दोन हजारांवरील वढकव्यवहारांवर एमडीआरला नाग विदर्भ चेंबरचा विरोध

**अर्थमंत्र्यांकडे निर्णयाचा फेरविचार करण्याची मागणी; लघु व्यापाऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची भीती**




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

दोन हजारांपेक्षा अधिक रकमेच्या एमडीआर व्यवहारांवर ०.४ टक्के Merchant Discount Rate अर्थात एमडीआर आकारण्याच्या निर्णयाला नाग विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सने विरोध केला आहे. या निर्णयाचा फेरविचार करावा, अशी मागणी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. विदर्भातील सुमारे १३ लाख व्यापाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या चेंबरने म्हटले आहे की, लघु आणि मध्यम व्यापाऱ्यांचे नफ्याचे प्रमाण कमी असताना MDRचा अतिरिक्त भार त्यांच्या व्यवसायावर परिणाम करू शकतो. व्यापारी ग्राहकांकडून पेमेंट स्वीकारण्यासोबतच घाऊक विक्रेते आणि उत्पादकांना देयके करण्यासाठीही एमडीआरचा वापर करतात.

याशिवाय Soundbox, POS, QR आणि इंटरनेटचा खर्च व्यापारी आधीच करीत आहेत. त्यात MDRची भर पडल्यास डिजिटल व्यवहारांचा खर्च वाढण्याची शक्यता आहे. कृषी क्षेत्राशी संबंधित व्यवहारांवरही योग्य वर्गीकरण करून अतिरिक्त भार टाळावा, अशी मागणी चेंबरने केली आहे. डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणाऱ्या व्यापारी समुदायावर अतिरिक्त आर्थिक भार पडू नये, यासाठी २ हजारांवरील वढक व्यवहारांवरील MDRचा निर्णय मागे घ्यावा किंवा त्याचा फेरविचार करावा, अशी मागणी नाग विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्सने केली आहे.

## नगर परिषद शाळेतील पालकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर,१४४ पालकांनी घेतला लाभ




**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

नगर परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करण्यासह त्यांच्या वैद्यकीय अडचणी वेळेत दूर करण्याच्या उद्देशाने ३ ऑक्टोबर २०२६ रोजी स्व. विठ्ठलराव हटवार नगर परिषद उच्च प्राथमिक शाळा, जयप्रकाश वार्ड येथे पालकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तब्बल १४४ पालकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. पालक निरोगी व जागरूक असतील, तर विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि शैक्षणिक प्रगती चांगली राहते, या उद्देशाने शिक्षण विभागाच्या पुढाकारातून हे शिबिर घेण्यात आले. मधुमेह, उच्च रक्तदाब यांसारख्या असंसर्गजन्य आजारांसह विविध आजारांबाबत जनजागृती, तसेच अन्न, पोषण व स्वच्छतेविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, रामटेकच्या वैद्यकीय पथकाने पालकांची तपासणी केली. डॉ. आम्रपाली लाडे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ कल्याणी खेड्गरकर, स्टाफ नर्स ऋषिकेश राठोड व हिमांशू चोपकर यांनी सेवा दिली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक चंद्रशेखर धावडे यांच्यासह स्वाती देशमुख, कल्पना भांगे, पायल नाटकर, सत्यभामा दुन्डे, कुसुम महाजन, वनिता देशमुख व शारदा महाजन यांनी परिश्रम घेतले. नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन, मुख्याधिकारी पल्लवी राउत, उपाध्यक्ष आलोक मानकर, शिक्षण सभापती सुरेखा माकडे यांच्यासह नगरसेवकांनी आयोजकांचे कौतुक केले.

## प्रा. विठ्ठल ह. सपकाळ यांना मराठी विषयात आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल, रामटेक येथील मराठी विषयाचे शिक्षक प्रा. विठ्ठल ह. सपकाळ यांनी मराठी विषयात संत



गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत आचार्य (पीएच.डी.) ही मानाची पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.प्रा. सपकाळ यांनी एकविसाव्या शतकातील वैदर्भीय ग्रामीण कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास या विषयावर सखोल संशोधन करून आपला प्रबंध सादर केला. त्यांच्या संशोधनास प्रा. डॉ. शिवाजी नागरे, मराठी विभाग प्रमुख, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच केंद्र समन्वयक प्रा. डॉ. अरुण शेळके आणि प्राचार्य जगदीश साबू यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

एकविसाव्या शतकातील वैदर्भीय ग्रामीण कादंबरीचा चिकित्सक दृष्टिकोनातून अभ्यास करताना ग्रामीण जीवन, सामाजिक वास्तव, बोलीभाषा, ग्रामीण संस्कृती, शिक्षणव्यवस्था, सामाजिक प्रश्न आणि बदलत्या ग्रामीण जीवनाचे साहित्यिक प्रतिबिंब यांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्याच्या अभ्यासाला संशोधनात्मक दिशा मिळण्याबरोबरच या क्षेत्रातील विद्यार्थी, संशोधक आणि अभ्यासकांना या संशोधनाचा निश्चितच मोठा फायदा होणार आहे. प्रा. सपकाळ यांच्या या शैक्षणिक कामगिरीबद्दल प्रा. डॉ. गिरीश सपाटे, विद्यासागर महाविद्यालय रामटेक, एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कूल, रामटेकच्या प्राचार्या रूपा बोरेकर, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

अध्यापनासोबत संशोधनाची वाटचाल अखंड ठेवत मराठी साहित्याच्या समृद्धीसाठी योगदान देणाऱ्या प्रा. विठ्ठल ह. सपकाळ यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक कायार्लाही नवी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

# दिपकेंनी बाबासाहेबांचा अपमान केला : धर्मपाल मेश्राम

**आंबेडकरी जनतेची माफी मागा अन्यथा धडा शिकवू : मेश्राम यांचा इशारा**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके हे अतिशय बालिश वक्तव्य करीत असून, मुंबईत त्यांनी पंडित जवाहरलाल नेहरुंसोबत संविधान निर्माते डॉ. बाबासाहेबांच्या अतुलनीय कार्यांची तुलना केली.हा बाबासाहेबांचा घोर अपमान असून दिपके यांनी देशातील संपूर्ण आंबेडकरी जनतेची माफी न मागितल्यास त्यांना धडा शिकऊ असा इशारा आज पत्रकार परिषदेत भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व अनुसूचित जाती-जमातीचे माजी उपाध्यक्ष ॲड.धर्मपाल मेश्राम यांनी दिला. या प्रसंगी बोलताना ते म्हणाले,की ज्या काँग्रेसने १९३७ असो किंवा १९५२, लोकसभेच्या निवडणूकीत बाबासाहेबांचा पराभव करण्यासाठी प्रयत्नांची परकाष्ठा केली, बाबासाहेबांसाठी संसदेची दारेच नव्हे तर खिडकी देखील उघडणार नसल्याची वल्गना केली,पंडित नेहरुंच्या स्वीय सहायकाला बाबासाहेबांच्या विरुद्ध निवडणूकीत उतरवले अश्या नेहरुंसोबत दिपके, बाबासाहेबांच्या कार्याची तुलना करतात,त्यांची ही भूमिका आम्ही सर्वार्थाने नाकारत असल्याचे ते म्हणाले.

बाबासाहेब स्वतः काँग्रेस हे जळतं घर असल्याची टिका करीत असे. त्यामुळे पं. नेहरुंसोबत बाबासाहेबांच्या वैचारिक भूमिकांची तुलना होऊच शकत नाही. याशिवाय दिपके हे त्याही पुढे जात १९९९ नंतर जन्माला आलेल्या पिढीला



संविधान व संवैधानिक अधिकारांविषयी चुकीची माहिती देत आहेत,असा आरोप त्यांनी केला.

जेव्हा देशात लोकांना लोकशाही,निवडणूका,मतदानाच ा संवैधानिक अधिकार ही समजत नव्हता त्यावेळी पंडित नेहरु व बाबासाहेबांनी त्यांना १९३६ मध्येच मतदानाचा अधिकार दिला,ही पंडित नेहरु व बाबासाहेबांची महानता असल्याची वल्गना दिपकेंनी केली.दिपके जेन-झी पिढीमध्ये फार मोठा संभ्रम निर्माण करीत असून,त्यांची दिशाभूल करीत असल्याचा आरोप ॲड.मेश्राम यांनी केला. पंडित नेहरुंच्या रांगेत बाबासाहेब आंबेडकरांना दिपके नेऊन बसवित आहेत. दिपके नेहरुंना मोठे करीत असून बाबासाहेबांना दुय्यम करीत असल्याचा गंभीर आरोप याप्रसंगी मेश्राम यांनी केला. आम्हाला नेहरुंसोबत बाबासाहेबांची तुलना मान्य नाही, यासाठीच आम्ही दिपकेंच्या विवादास्पद भूमिकेचा विरोध करण्यासाठी पत्रकार परिषद घेत असल्याचे मेश्राम यांनी सांगितले.

दिपके केवळ संविधानच नव्हे तर देशातील सर्व संवैधानिक संस्थांविषयी जनतेच्या मनात संशय निर्माण करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.जेन-झी पिढीला चुकीच्या आंदोलनांच्या मार्गावरुन तुरुंगात टाकण्याचा विडा त्यांनी उचलला आहे,अशी जहाल टिका त्यांनी केली.त्यांना पैशांचा पुरवठा कुठून होत आहे,याचा खुलासा त्यांनी करावा,अशी मागणी त्यांनी केली.

# जागतिक फुफ्फुस दिनानिमित्त विदर्भ चेस्ट असोसिएशनचा जनजागृती उपक्रम

**वॉकेथॉनसह मोफत पीएफटी व स्पायरोमेट्री तपासणी शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद, ९० रुग्णांची आरोग्य तपासणी**

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

जागतिक फुफ्फुस दिनाचे औचित्य साधून विदर्भ चेस्ट असोसिएशनतर्फे नागपुरात श्वसन आरोग्य आणि फुफ्फुसांच्या आजारांबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. "A Lifetime of Lung Health" अर्थात 'आयुष्यभर फुफ्फुसांचे आरोग्य' या यंदाच्या जागतिक संकल्पनेनुसार नागरिकांमध्ये फुफ्फुसांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी वॉकेथॉन तसेच विविध रुग्णालये आणि क्लिनिकमध्ये मोफत टीएफटी व स्पायरोमेट्री तपासणी शिबिरे घेण्यात आली.

विदर्भ चेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेश स्वर्णकार आणि मानद सचिव डॉ. नैनेश पटेल यांच्या नेतृत्वाखाली हा जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. श्वसन आरोग्याला आयुष्यभर प्राधान्य देणे, श्वसनविकारांचे लवकर निदान करणे आणि फुफ्फुसांचे आरोग्य जपण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपायांबाबत नागरिकांना माहिती देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.




**ईएसआयएस रुग्णालय, सोमवारीपेठ येथे ४६ रुग्णांची तपासणी**

सेवा संकल्प अभियानांतर्गत ईएसआयएस रुग्णालय, सोमवारीपेठ येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वैशाली व्यवहारे यांच्या आदेशानुसार आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ४६ विमेदार रुग्णांची आरोग्य तपासणी तसेच मोफत फुफ्फुस कार्यक्षमता तपासणी (स्पायरोमेट्री) करण्यात आली. छातीविकार तज्ज्ञ डॉ. आदित्य परिहार यांनी रुग्णांची तपासणी करून वैद्यकीय सल्ला दिला. फुफ्फुसांचे आरोग्य चांगले कसे राखावे, श्वसनविकारांपासून बचाव कसा करावा तसेच निरोगी जीवनशैलीचे महत्त्व याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. हर्षवर्धन कांबळे होते. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. फैजान जौवाद खान आणि डॉ. प्रणय चांदेकर यांनी केले.

**गेटवेल रुग्णालयात ३२ रुग्णांची तपासणी**

जागतिक फुफ्फुस दिनानिमित्त आयोजित मोफत टीएफटी व स्पायरोमेट्री तपासणी उपक्रमांतर्गत गेटवेल रुग्णालय, धंतोली येथे ३२ रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली. फुफ्फुसांच्या कार्यक्षमतेची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन करण्यात आले.

**सेंट्रल इंडिया चेस्ट सेंटरमध्ये १२ रुग्णांची तपासणी**

सेंट्रल इंडिया चेस्ट सेंटर, काँग्रेस नगर येथे १२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. या शिबिरादरम्यान फुफ्फुसांच्या आरोग्याबाबत आवश्यक माहिती देत श्वसनविकारांचे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या तीन ठिकाणी झालेल्या उपक्रमांमध्ये एकूण ९० रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

**फुफ्फुसांच्या आरोग्यासाठी '५ स्तंभां'चा संदेश**

विदर्भ चेस्ट असोसिएशनच्या या मोहिमेत निरोगी फुफ्फुसांसाठी पाच महत्त्वाच्या बाबींवर विशेष भर देण्यात आला. यामध्ये नियमित टीएफटी व स्पायरोमेट्रीद्वारे फुफ्फुसांची कार्यक्षमता तपासणे, धूम्रपानाचा त्याग, वायुप्रदूषणापासून बचाव, आधुनिक निदान पद्धतींचे महत्त्व आणि वेळेवर प्रौढ लसीकरण यांचा समावेश आहे.

वाढते प्रदूषण, धूम्रपान आणि विविध संसर्गांमुळे दमा, COPD, न्यूमोनिया, टीबी आणि पल्मोनरी फायब्रोसिस यांसारख्या श्वसनविकारांचा धोका वाढत आहे. सततचा खोकला, श्वास घेण्यास त्रास किंवा अनाकलनीय थकवा यांसारखी लक्षणे आढळल्यास वेळेवर तज्ज्ञांचा सल्ला घेणे आणि आवश्यक तपासण्या करून घेणे महत्त्वाचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**नागरिकांनी फुफ्फुसांच्या आरोग्याला प्राधान्य द्यावे**

जागतिक फुफ्फुस दिन हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित जनजागृतीचा उपक्रम नसून, प्रत्येकाने आपल्या श्वसन आरोग्याला आयुष्यभर प्राधान्य देण्याची आठवण करून देणारा दिवस आहे. नियमित तपासणी, धूम्रपानमुक्त जीवनशैली आणि प्रदूषणापासून बचाव यामुळे फुफ्फुसांचे आरोग्य जपण्यास मदत होऊ शकते, असे विदर्भ चेस्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राजेश स्वर्णकार यांनी सांगितले. नागरिकांनी आपल्या फुफ्फुसांच्या आरोग्याकडे गांभीर्याने लक्ष देत श्वसनविकारांची लक्षणे दिसून आल्यास वेळेत वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन विदर्भ चेस्ट असोसिएशनतर्फे करण्यात आले.

## चार सराईत गुन्हेगारांना दोन महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार

**आमगाव पोलिसांची कारवाई, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५५ अन्वये प्रस्तावाला मंजुरी**



**दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव**

आमगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत वारंवार गुन्हेगारी कारवायांमध्ये सहभागी असलेल्या चार जणांविरुद्ध पोलिसांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम ५५ अन्वये हद्दपारीची कारवाई केली आहे. संबंधितांना दोन महिन्यांच्या कालावधीसाठी गोंदिया जिल्ह्यातून हद्दपार करण्याचा अंतिम आदेश प्राप्त झाला आहे. हद्दपार करण्यात आलेल्यांमध्ये शुभम अनिल राहुलकर (२४), मनीष विनोद रहिले (२०), हर्ष दालचंद साठवणे (२१) आणि कुणाल अनिल राहुलकर (१८), सर्व रा. भवभूतीनगर, तसेच गणेशपुर, ता. आमगाव, जि. गोंदिया येथील रहिवाशांचा समावेश आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, या टोळीविरुद्ध मागील काही वर्षांपासून महिलांना त्रास देणे, मालमत्तेची चोरी करणे, अश्लील शिवीगाळ करून मारहाण करणे, शारीरिक दुखापत करणे, सार्वजनिक रस्त्यावर अडथळा निर्माण करणे तसेच विविध प्रकारच्या बेकायदेशीर कृत्यांमध्ये सहभागी होणे यासंदर्भात गुन्हे दाखल आहेत. वारंवार गुन्हे दाखल करूनही त्यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रतिबंधात्मक कारवाई म्हणून हद्दपारीचा प्रस्ताव सादर करण्यात आला.

पोलिसांनी सादर केलेल्या गुन्हेगारी अभिलेख, पोलीस अहवाल व इतर संबंधित बाबींच्या आधारे हद्दपारीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. त्यानुसार संबंधित चार जणांना दोन महिन्यांसाठी गोंदिया जिल्ह्यातून हद्दपार करण्याचा अंतिम आदेश प्राप्त झाला आहे. ३० सप्टेंबर २०२६ रोजी छत्तीसगड राज्यातील राजनांदगाव जिल्ह्यातील डोंगरगड येथे संबंधितांना हद्दपारीच्या आदेशाची माहिती देऊन आदेशाची अंमलबजावणी करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई गोंदिया जिल्हा पोलीस अधीक्षक गौरव अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदिनी चानपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आमगावचे पोलीस निरीक्षक नीलकंठ कुकडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रेवचंद सिंगनजुडे आणि त्यांच्या पथकाने केली. वारंवार गुन्हेगारी कारवाया करणाऱ्यांविरुद्ध कठोर प्रतिबंधात्मक कारवाई सुरूच राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रतिभास्थली ज्ञानोदय विद्यापीठाचा डंका

**१९ वर्षांखालील मुलींच्या संघाने पटकावले तृतीय स्थान, चुरशीच्या उपांत्य सामन्यात काटोलकडून निसटता पराभव**

**दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक**

आनंद नगर येथील हनुमान मंदिराजवळील व्हॉलीबॉल मैदानावर शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी आयोजित जिल्हास्तरीय शालेय व्हॉलीबॉल स्पर्धेत प्रतिभास्थली ज्ञानोदय विद्यापीठ, रामटेकच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने दमदार कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला. विविध तालुक्यांमधून आलेल्या १६ संघांच्या सहभागामुळे स्पर्धेला चांगलीच रंगत आली होती. मौदा, हिंगणा, सावनेर, नरखेड, कामठी, कळमेश्वर, पारशिवणी तसेच नागपूर ग्रामीण आदी भागांतील संघांनी स्पर्धेत सहभाग घेत आपले क्रीडाकौशल्य पणाला लावले.



प्रतिभास्थली ज्ञानोदय विद्यापीठाच्या संघाने सुरुवातीपासूनच आत्मविश्वासपूर्ण आणि शिस्तबद्ध खेळाचे प्रदर्शन केले. संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट सर्व्हिस, अचूक पासिंग, प्रभावी स्मॅश तसेच बचावात्मक खेळाच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांसमोर कडवे आव्हान उभे केले.

संघातील प्रत्येक खेळाडूने सांघिक भावनेने खेळ करत विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. उपांत्य फेरीतील सामना रामटेक आणि काटोल या दोन संघांमध्ये अत्यंत चुरशीचा झाला. सामन्यात दोन्ही संघांनी आक्रमक आणि उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्याने उपस्थित क्रीडाप्रेमींची उत्सुकता वाढली. अखेर १५-१६ आणि ९-१५ अशा अटीतटीच्या गुणफरकाने रामटेकच्या संघाला पराभव स्वीकारावा लागला. मात्र, या निसटत्या पराभवा नंतरही संघातील खेळाडूंनी खचून न जाता स्पर्धेतील आपली गुणवत्ता कायम राखली आणि तृतीय स्थानावर नाव कोरून रामटेकच्या क्रीडा क्षेत्राची मान उंचावली.

या संघाचे नेतृत्व कर्णधार आदिती हिने केले. तिच्यासोबत सावी, सिद्धी, तन्वी, आर्या, आर्या जानवे, रिया, सर्वज्ञ, रुचिता, समृद्धी, सायली, अनन्या, दिया, अंजली आणि प्रियल या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक कामगिरी बजावली. सर्व खेळाडूंनी मैदानावर दाखविलेली जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास आणि सांघिक समन्वय हे या यशाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. या यशामागे प्रतिभास्थली ज्ञानोदय विद्यापीठाच्या प्राचार्या रजनी दीदी, मोनिका दीदी तसेच क्रीडा शिक्षिका रिचा दीदी यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थिनींना सातत्याने प्रोत्साहन देत त्यांच्या क्रीडागुणांना योग्य दिशा देण्याचे काम त्यांनी केले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे मागील दहा वर्षांपासून मोफत क्रीडा सेवा देणारे राज्यस्तरीय व्हॉलीबॉल पंच, प्रशिक्षक तसेच आंतरराष्ट्रीय अँथलेटिक्स खेळाडू सोनू बेठेकर यांनी या विद्यार्थिनींना प्रशिक्षण दिले. अत्यंत गरजू आणि होतकरू मुलींना अवघ्या अडीच महिन्यांच्या कालावधीत कठोर सराव, शिस्त आणि तांत्रिक मार्गदर्शन देत स्पर्धेसाठी तयार करण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. अल्पावधीत घेतलेल्या या कठोर प्रशिक्षणाचे फलित जिल्हास्तरीय स्पर्धेतील तृतीय क्रमांकाच्या रूपाने मिळाले असून, प्रतिभास्थली ज्ञानोदय विद्यापीठातील विद्यार्थिनींमध्ये क्रीडा क्षेत्रातही उल्लेखनीय क्षमता असल्याचे या यशातून अधोरेखित झाले आहे.

शिक्षणा सोबतच विद्यार्थ्यांनी शारीरिक तंदुरुस्ती आणि क्रीडा क्षेत्रा कडेही गांभीर्याने पाहावे, असा संदेश या कामगिरीतून देण्यात आला आहे. यावेळी रामटेक वासीयांना मार्गदर्शन करताना खेळाडू आणि प्रशिक्षकांनी मुलांना मोबाईल व विविध स्क्रीनपासून काही काळ दूर ठेवून त्यांच्या आरोग्यासाठी दररोज किमान एक तास मैदानावर खेळण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले. नियमित खेळामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच आत्मविश्वास, शिस्त, एकाग्रता आणि सांघिक भावना विकसित होण्यास मदत होते, असेही त्यांनी सांगितले.

प्रतिभास्थली ज्ञानोदय विद्यापीठाच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत मिळविलेल्या या यशाबद्दल खेळाडू, प्रशिक्षक, प्राचार्या, क्रीडा शिक्षिका आणि संपूर्ण विद्यालयाचे विविध स्तरांतून कौतुक व अभिनंदन होत आहे. या कामगिरीमुळे रामटेकच्या क्रीडा क्षेत्राला नवी ऊर्जा मिळाली असून, भविष्यात या खेळाडूंकडून आणखी मोठ्या यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

थोडक्यात

## शिरपूर जिल्हा परिषद शाळेत वन्यजीव सप्ताह व वृक्षारोपण!

### वन्यजीव संवर्धनाचा संदेश; विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग !



**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या नागपूर वन प्रकल्प विभागातील उत्तर उमरेड वन परिक्षेत्राच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, शिरपूर येथे वन्यजीव सप्ताहानिमित्त जनजागृती उपक्रम व वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. विभागीय व्यवस्थापक अजिंक्य घाटेकर आणि सहाय्यक व्यवस्थापक पी. एन. खानंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात वन्यजीवांचे संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि वृक्षांचे महत्त्व याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाला उत्तर उमरेडच्या वनपरिक्षेत्र अधिकारी डी. बी. नागदिवे, वनपाल ए. डब्ल्यू. पवार, वन्यजीव रक्षक सौरभ भोयर, शाळेचे मुख्याध्यापक आकर्ते सर, पाटील सर, बाराई मॅडम, पोलीस पाटील जयश्री खानोरकर, वनरक्षक लालसरे मॅडम, जोगेकर मॅडम यांच्यासह वन विभागाचे कर्मचारी व गावातील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना वन्यजीव व वनसंपदेचे संरक्षण करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरण संतुलनासाठी वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित करत उपस्थितांनी वृक्षारोपण व संवर्धनाचा संदेश दिला.

## खापा माताखेडी येते आढळुन आला दुर्मिळ प्रजातिचा निम्न विषारी फोरेस्टर्न केट स्नेक

**दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर**

सावनेर तालुक्यातील खापा येथील माताखेडी निवासी रेवतकर यांच्या घरी बाहेर जाण्याकरीता जात असता दरवाजावर साप



दिसला तसेच नारिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. त्वरीत गोलु लाड यांनी पुर्व सर्पमित्र बबलू निमजे यांना सुचना दिली. त्वरीत घटना स्थळी सर्पमित्र विशाल शेंडे, प्रेम खडसे, सौरभ शेंडे सर्पमित्र सह्हायक प्रतिक बिजेकर घटना स्थली पोहचले पाहनी केली असता अति दुर्मिळ असनारा निम्न विषारी फोरेस्टर्न केट स्नेक म्हनजे मांजऱ्या प्रजातिचा साप दिसून आला.

सर्पमित्रानी सुरक्षित रेस्क्यू करुन खापा वनपरीक्षेत्र अधिकारी विजय गंगावने क्षेत्रसहायक उमेश बावने तथा वनरक्षक अंकुश झोटिंग यांच्या मार्गदर्शनामध्ये खुबाळा जंगल परिसरमध्ये निसर्ग मुक्त करण्यात आले. सर्पमित्र मयुर कनोजे (सर्पअभ्यासक खापरखेड़ा) यांच्या मते फोरेस्टर्न केट स्नेक प्रामुख्याने हा पेंच चा बफर परीसरमध्ये जास्त नोंद आहे. तथा हा पुर्णपणे निम्न विषारी आहे. हा आरबोरीअल प्रजातिमध्ये समाविष्ट असतो. आर्बोरीअल म्हनणजे झाडावर सहवास करणारे साप व हा साप निशाचर असतो तथा या सापापासुन १ वर्षापासुन ते ५ वर्षापर्यंत मुलांना चावल्यास धोका होऊ शकतो तथा सदर प्रजातीचा साप खापा परीसरात पहिल्यांदा आढळला असुन काळा आणी तांबूस अश्या दोन रंगात आढळतो. हा जंगल परिसरमधील सरडे पक्षी व पक्षांची अंडे खाद्य बनवुन निसर्ग समतोल ठेवण्याची प्रामुख्याने कार्य करतो. यांची लांबी ६ फुट पर्यंत असल्याची माहिती आहे.

## समान्य करिता मराठी शाळा टिकणे अनिवार्य : आ. अभिजित वंजारी

### नागपूर जिल्हास्तरीय मुख्याध्यापकांचे संमेलन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शेतकरी,कष्टकरी सामान्य पालक यांची मुले शिक्षण प्रवाहात टिकण्यासाठी त्यांना परवडणाऱ्या मराठी शाळा टिकणे आज काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्रातील अडचणी कमी करून विदयार्थी, शिक्षक, संबंधित घटकांना संरक्षण मिळाले पाहिजे. सामान्यांना परवडेल अशी शिक्षण व्यवस्था शासनाने निर्माण करावी असे मत आमदार अभिजित वंजारी यांनी व्यक्त केले. कमला नेहरू विद्यालय सक्करधरा नागपूर येथे शनिवारला जिल्हास्तर ग्रामीण माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचेवतीने शनिवार, ३ ऑक्टोबरला संमेलन यशस्वी पार पडले.

यावेळी उद्घाटक म्हणून आ. अभिजित वंजारी बोलत होते. त्यांनी पदवीधर मतदार संघ आमदार असतांना विविध सोडविलेल्या समस्या, प्रश्न,वाचनालय टिकण्यास वाढविलेला निधी आदी महत्वपूर्ण कार्याचा आढावा दिला.यावेळी जिल्ह्यातील सेवा निवृत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापकांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्याचे माजी अध्यक्ष मारोती खेडेकर, विदर्भ अध्यक्ष समीर देवतळे, राज्य संघटक नरेशचंद्र वाळके, जिल्हा अध्यक्ष विलीन आरघोडे,सचिव अतुल देशमुख, कार्याध्यक्ष हरिभाऊ खोडे, कोषाध्यक्ष चंदा खुपसरे,प्रसिद्धी प्रमुख सज्जन पाटील,जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मारोती खेडकर यांनी अध्यक्षीय मार्गदर्शनात शिक्षकांचे प्रश्न सोडविल्याची माहिती दिली. प्रास्ताविक संघांचे अध्यक्ष विलीन आरघोडे तर आभार सज्जन पाटील यांनी मानले. उपस्थित मुख्याध्यापकांनी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले.

# विदर्भस्तरीय 'भजन रंग' स्पर्धेत 'स्वर कमल म्युझिक अकॅडमी' प्रथम

## श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्टतर्फे पुरस्कार वितरण सोहळा संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

श्री गणेशोत्सवानिमित्त श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट, झिल्पी, मोहगाव यांच्या वतीने आयोजित विदर्भस्तरीय 'भजन रंग' भव्य भजन स्पधेर्ला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पधेर्चा पारितोषिक वितरण सोहळा श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट, झिल्पी येथे शुक्रवारी पार पडला. स्पर्धेत स्वर कमल म्युझिक अकॅडमी, बालाजी नगर, नागपूर यांनी प्रथम क्रमांक पटकावत ४१ हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले. श्री कृपा भजन मंडळ, महाल, नागपूर यांनी द्वितीय क्रमांक मिळवत ३१ हजार रुपये, तर उज्वल भजनी मंडळ, उज्वल नगर, नागपूर यांनी तृतीय क्रमांक मिळवत २१ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले.

उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी पाच हजार रुपये देऊन नवचैतन्य भजन मंडळ, गोपाल नगर; गुरुदेव सेवा मंडळ, जुनी शुक्रवारी; कला वैभव म्युझिक अकॅडमी, प्रशांत नगर; विठ्ठल रुक्मिणी भजन मंडळ, पारधी नगर; गुरुमाऊली भजन मंडळ, सक्करदरा; राष्ट्रसंत कृपा भजन मंडळ, आरंभी, नरखेड; श्री गुरुदेव सेवा मंडळ, खराळा, नरखेड आणि नाद रंग भजन मंडळ, उदय नगर यांचा गौरव करण्यात आला.

विशेष पारितोषिक म्हणून सारस्वत भजन मंडळ, जानकी नगर, नागपूर यांना सात हजार रुपये प्रदान करण्यात आले.

ट्रस्टचे अध्यक्ष संदीप जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेचे हे तिसरे वर्ष होते. पुरस्कार वितरण सोहळ्यापूर्वी आनंद कीटकरू आणि आनंद देशमुख यांच्या चमूने सुमारे एक तास भक्तिमय भजनांची प्रस्तुती केली. यावेळी संदीप जोशी यांनी सहभागी सर्व भजनी मंडळांचे अभिनंदन केले. पुढील वर्षी ही स्पर्धा आणखी भव्य स्वरूपात आयोजित करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. तसेच श्री सिद्धिविनायक मंदिराची स्थापना कशी झाली, याबाबतची थोडक्यात माहितीही त्यांनी दिली.

त्यानंतर मंदिराचे अध्यक्ष संदीप जोशी, उपाध्यक्ष पराग सराफ, विश्वस्त प्रफुल्ल माटेगांवकर, गजानन निशिदकर, सुमेध कुळकर्णी आणि परीक्षक दिगंबर





बुवा नाईक यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व भजनी मंडळांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता.

कार्यक्रमाचे संचालन प्रफुल्ल माटेगांवकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी निरज दोंतुलवार, शैलेश राऊत, कल्पना सातपुते आणि रोहित मडावी यांनी विशेष योगदान दिले.

# शेफ नीता अंजनकर आज करणार ५५० किलो गोपालकाला बनवण्याचा विक्रम



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या प्रसिद्ध शेफ आणि कॅन्सर योद्ध्या नीता अंजनकर रविवार, ४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता काँग्रेसनगर येथील धनवटे नॅशनल कॉलेजमध्ये तब्बल ५५० किलो गोपालकाला तयार करून वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स, लंडनमध्ये नवा विक्रम नोंदविण्याचा त्या प्रयत्न करणार आहे.

यापूर्वीही शेफ नीता अंजनकर यांनी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि आशिया बुक ऑफ रेकॉर्डसमध्ये १,००० किलो आंबील तयार करण्याचा विक्रम नोंदविला आहे. तसेच ५०० किलो कच्चा चिवडा तयार करण्याची विक्रमी कामगिरीही त्यांच्या नावावर आहे. आता ५५० किलो गोपालकाला तयार करून त्या आणखी एका विक्रमाच्या दिशेने पाऊल टाकणार आहेत.

महाराष्ट्र टेलिकम्युनिकेशनच्या वतीने आयोजित विदर्भस्तरीय पाककला स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळादेखील होईल.

## रामकृष्ण जुनघरे यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड :** श्री रामकृष्ण जुनघरे, ज्येष्ठ, पत्रकार, कवी, नाट्यकर्मी, सामाजिक कार्यकर्ते बुधवारी पेठ उमरेड यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी दि. ०३/१०/२०२६ ला दुपारी ३.५० वाजता दुःखद निधन झाले. अंत्यविधी दिनांक ०४/१०/२०२६ सकाळी १० वाजता आमनदी, डबलू. सी. एल. स्मशान भूमी उमरेड येथे होणार आहे होईल.



## हिंदी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय गीतांतून मराठी कलाकारांच्या योगदानाचा सांगीतिक वेध

### स्वरशिल्पतर्फे गाजलेल्या गीतांची बहारदार मेजवानी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

हिंदी चित्रपटसृष्टीच्या जडणघडणीत मराठी कलाकार, गीतकार, संगीतकार, अभिनेते, अभिनेत्री आणि दिग्दर्शकांनी दिलेल्या योगदानाचा सांगीतिक वेध घेणारा 'महाराष्ट्र से बॉलिवूड तक' हा विशेष कार्यक्रम शुक्रवारी सायंटिफिक हॉल येथे रंगला. 'स्वरशिल्प'च्या वतीने आयोजित या कार्यक्रमातून विविध दशकांतील लोकप्रिय हिंदी गीतांची बहारदार मेजवानी रसिकांना अनुभवता आली. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शालिनी ईटनकर उपस्थित होत्या. हिंदी चित्रपटसृष्टीत मराठी कलाकारांचे योगदान ही कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना स्वरशिल्पच्या संचालिका भाग्यश्री बारस्कर यांची होती. भाग्यश्री बारस्कर यांच्या ऐ मालिक तेरे बंदे हम या प्रार्थनेने सांगीतिक मैफलीला सुरुवात झाली. त्यानंतर संदीप जोशी यांनी एक अकेला इस शहर में, देवयानी जोशी यांनी ऐ जिंदगी गले लगा ले, नंदिनी पाटणकर यांनी पिया तू, सुनीता मोहरीर यांनी रोज शाम आती थी, भाग्यश्री बारस्कर यांनी जाने कैसे कब कहाँ आणि काहे छेड़ छेड़, विद्या काणे यांनी रजनीगंधा फूल, तन्मया मुंडले यांनी ईना मीना डीका, मृणालिनी भगत यांनी दिल दीवाना बिन सजना के, पल्लवी उपदेव यांनी सुलताना सुलताना, वैशाली देव यांनी पूछो ना यार, विजया सालनकर यांनी रहे न रहे हम, सुप्रिया फडके यांनी तूने ओ रंगीले, देविका बुटी यांनी सात समंदर पार, मंजुषा जोशी यांनी ये आँखें देखकर, सलीला कामत यांनी जो हाल दिल का, संगीता करंदीकर यांनी ये मेरा दिल आणि श्रेया फडके यांनी तनहा तनहा, या लोकप्रिय गीतांचे सादरीकरण केले.

डॉ. सदाशिव भोळे व डॉ. शांतला भोळे यांनी सुन बेलिया आणि दो दीवाने शहर में, तर वेंकटेश बुटी व शिवांगी बुटी यांनी खुल्लम खुल्ला प्यार करेंगे ही द्वंद्वगीते सादर केली. कार्यक्रमाची सांगता हम तेरे प्यार में सारा आलम या गाण्याच्या जॅमिंगने झाली. सभागृहात मोठ्या संख्येने उपस्थित लोकांनी सूरात सूर मिसळून गाण्याचा आनंद घेतला.९ फेब्रुवारीला याच धर्तीवर बंगाल से बॉलिवूड तक हा कार्यक्रम सादर होणार आहे. परिमल जोशी, नंदू गोहणे, प्रशांत नागमोटे आणि रितेश त्रिवेदी यांनी वाद्यवृंदावर गायक कलाकारांना सुरेल साथ दिली. माहितीपूर्ण सूत्रसंचालनातून श्वेता शेलगावकर यांनी हिंदी चित्रपटसृष्टीच्या जडणघडणीत मराठी कलाकार, गीतकार, संगीतकार, अभिनेते, अभिनेत्री आणि दिग्दर्शकांनी दिलेल्या योगदानाचा सांगीतिक प्रवास उलगडला.

# नागपुर–बिलासपुर रेल मार्ग पर लोकल ट्रेनों की लेटलतीफी से आम यात्री परेशान

### रेलगाड़ी बनी बैलगाड़ी

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा – नागपुर**

दक्षिण पूर्व मध्य रेलवे के नागपुर-बिलासपुर रेल मार्ग पर चलने वाली लोकल ट्रेनों की लगातार लेटलतीफी ने आम यात्रियों की परेशानी बढ़ा दी है। यात्रियों के अनुसार अधिकांश लोकल ट्रेनें २ से ३ घंटे तक देरी से चल रही हैं, जिसके कारण रोजाना आने-जाने वाले नौकरीपेशा लोगों, विद्यार्थियों, व्यापारियों और अन्य यात्रियों को भारी दिक्कतों का सामना



करना पड़ रहा है।

यात्रियों का कहना है कि समय पर गंतव्य तक पहुंचना मुश्किल होता जा रहा है। ट्रेन के इंतजार में स्टेशनों पर घंटों समय बर्बाद हो रहा है। खासकर रोजाना यात्रा करने वाले यात्रियों के लिए यह समस्या गंभीर बनती जा रही है।

**एक्सप्रेस ट्रेनें भी प्रभावित**

सिर्फ लोकल ट्रेनों की ही स्थिति खराब नहीं है, बल्कि एक्सप्रेस ट्रेनों के परिचालन में भी देरी की शिकायतें सामने आ रही हैं। यात्रियों का सवाल है कि जब रेलवे द्वारा समय-सारणी निर्धारित की गई है, तो उसका पालन सुनिश्चित क्यों नहीं किया जा रहा?

**आम यात्रियों की सुध कौन लेगा?**

यात्रियों में नाराजगी है कि लंबे समय से ट्रेनें देरी से चल रही हैं, लेकिन आज तक इस समस्या का स्थायी समाधान होता नजर नहीं आ रहा है। आम आदमी अपने काम, नौकरी और जरूरी कार्यों के लिए रेलवे पर निर्भर है, ऐसे में लगातार हो रही देरी से उसकी दिनचर्या पूरी तरह प्रभावित हो रही है।

यात्रियों की मांग है कि दक्षिण पूर्व मध्य रेलवे इस समस्या को गंभीरता से लेते हुए नागपुरझबिलासपुर मार्ग की लोकल एवं एक्सप्रेस ट्रेनों के समयबद्ध संचालन की व्यवस्था सुनिश्चित करे, ताकि आम यात्रियों को राहत मिल सके।

# घर जळून सिलेंडरचा स्फोट, शेतमजूर महिलेचे संसारोपयोगी साहित्य खाक

**दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड**

शेतात मजुरीसाठी गेलेल्या महिलेच्या घराला अचानक आग लागून संपूर्ण घर जळून खाक झाल्याची घटना ठोंबरा, ता. उमरेड येथे शनिवारी सकाळी घडली. आगीत घरातील संसारोपयोगी साहित्य जळून नष्ट झाले असून, घरातील गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने नुकसानात आणखी भर पडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

ठोंबरा येथील रहिवासी सत्वशीला भावराव शेंडे वय ५२ या नेहमीप्रमाणे सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास



शेतात मजुरी करण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी त्यांच्या घराला आग लागली. आगीची माहिती मिळताच उमरेड नगर परिषदेच्या अग्निशमन विभागाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाने घटनास्थळी पोहोचून आगीवर नियंत्रण मिळविले. मात्र, तोपर्यंत घरातील बहुतांश साहित्य जळून खाक झाले होते. आगीदरम्यान गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याचेही सांगण्यात आले.

सत्वशीला शेंडे या त्यांचा मुलगा साहिल शेंडे याच्यासोबत राहत होत्या. साहिल हा नागपूर येथील आर. एस. मुंडले महाविद्यालयात बी.कॉम. द्वितीय वषार्चे शिक्षण घेत असून, घटनेच्या वेळी तो नागपूर येथे होता. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

आगीत संपूर्ण घर उद्ध्वस्त झाल्याने शेंडे कुटुंबीयांकडे अंगावरील कपड्यांव्यतिरिक्त काहीही शिल्लक राहिलेले नाही. घरातील कपडे, धान्य, भांडी, घरगुती साहित्य यासह अन्य वस्तू जळून नष्ट झाल्या आहेत. घरच आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने कुटुंबासमोर आता निवाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

घटनेनंतर पोलिसांनी पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, तहसील कार्यालय उमरेडच्या माध्यमातूनही घटनेची चौकशी करण्यात येत आहे. माँ माजीसा गॅस एजन्सी, उमरेड यांच्याकडूनही घटनेबाबत माहिती घेण्यात आली असून, चौकशीनंतर पुढील मदतीबाबत निर्णय घेतला जाईल, असे सांगण्यात आले. दरम्यान, तहसीलदार प्रेमकुमार आडे यांनी या घटनेची नोंद घेतली असून, शासकीय नियमानुसार नुकसानग्रस्त कुटुंबाला शक्य तितक्या लवकर मदत मिळवून देण्यासाठी कार्यवाही केली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

संपूर्ण संसार आगीत उद्ध्वस्त झालेल्या शेंडे कुटुंबाला शासनाने तातडीने आर्थिक मदत तसेच निवाऱ्याची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

